श्री

फब्रुवारी १९८५] श्री साई

[किंमत १ रुप

# साईलील

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीचे अधिकृत मासि



श्रीसाईलीला
फेब्रुवारी १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक
श्री. रा. द. बन्ने
कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

प्रा. सौ. इंदिरा खेर
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)

## श्री साईकाव्य बहार विशेषांक

वर्ष ६४ वे] किंमत १ रुपया [अंक ११ वा
दूरध्वनी ४१२२५६१

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा विश्वभर प्रसार करणे हे श्री साईलीलेचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# श्री साई वाक्सुधा

राम आणि रहीम एक।
यत्किंचितही नाहीं फरक।
मग भक्तींच धरावी कां अटक।
वर्तावें तुटक किमर्थ ॥५० ॥
काय तुम्ही लेकरें मूढ।
बांधा हिंदु-अविंधांची सांगड।
व्हा दृढ सुविचारा रूढ।
तरीच पैल थड पावाल ॥५१ ॥
वादावादी नाही बरी।
नको कुणाची बरोबरी।
व्हा नित्य निजहिताचे विचारी।
रक्षील श्रीहरी तुम्हांला ॥५२ ॥
योग-याग-तप-ज्ञान।
हे सर्व हरि प्राप्तीचे साधन
असूनि हें जो हरिविहीन।
व्यर्थ जनन तयाचें ॥५३ ॥
कोणी कांही केलिया अपकार।
आपण न करणें प्रतिकार।
करवेल तरी करा उपकार
उपदेश सार हा त्यांचा ॥ ५४।

— श्री साई सच्चरित् अध्याय १० वा.

# सुविचार

गुण वद गुण वद्वा कुर्वता कार्य मादौ।
परिणतिख धार्या यत्नतः पण्डितेन।
अतिरभसकृतानां कर्मणामा विपत्तेः।
भवति हृदयदाही शल्य तुल्योविपाकः

योग्य किंवा अयोग्य, कोणतेही कर्म कार्य करताना शहाण्या माणसाने आधी परिणामांचा विचार करूनच प्रयत्न करावा. कारण अतिशय घाईने केलेल्या कर्माचा परिणाम मरेपर्यंत हृदयाला जाळणाऱ्या शल्या प्रमाणे होतो.

## सुस्वागत

श्री साईलीला लेखक-कवींच्या बाराव्या संमेलन प्रसंगी आम्ही सर्व उपस्थितांचे सहर्ष स्वागत करीत आहोत.

— संपादक

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साई काव्यबहार विशेषांक - १९८६

## अनुक्रमणिका



| क्रमांक | कवितेचे नाव | | कवी-कवयित्री नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | बारावे लेखक-कवी संमेलन | ६ |
| २ | संमेलनाची वाटचाल | — | | ७ |
| ३ | साई रामायणाचे पद | — | प्रा. डॉ. मा.चिं. दिक्षित | ८ |
| ४ | तवपदीचा जोडा | — | डॉ. सुमती खानविलकर | ९ |
| ५ | भक्तीसूरांच्या तालावर | — | डॉ. विनायक दुर्गे | ९ |
| ६ | विश्रांती | — | डॉ. मालती राहाटे | १० |
| ७ | साई स्मरण | — | सौ. सरोजिनी मुळ्ये | १० |
| ८ | साईचा दास | — | डॉ. वाय.एन. हिब्बारे | ११ |
| ९ | आई | — | डॉ. इंदूताई नाईक | ११ |
| १० | तू असता समर्थ पाठीराखा | — | सौ. शकुंतला जगतकर | १२ |
| ११ | शिर्डीश्वर मज हाती धरा | — | श्री. चकोर आजगावकर | १२ |
| १२ | आर्शीवाद असू द्यावा | — | सौ. मीरा नाईक | १३ |
| १३ | कलीयुगाचा देव | — | डॉ. रा.सी. कापडी | १३ |
| १४ | अहोभाग्य | — | प्रा. एच.बी. महाले | १४ |
| १५ | सोने होणे हेच म्हणा की | — | प्रा. र.श्री. पुजारी | १५ |
| १६ | प्रभु साईनाथा | — | सौ. वासंती नांदेडकर | १५ |
| १७ | अवघा आनंदीआनंद | — | श्री. राम झरेकर | १६ |
| १८ | सबका मालिक एक है | — | श्री. कृ.व्यं. हवालदार | १७ |
| १९ | साई दर्शनाची ओढ | — | श्री. दामोदर पाटील | १७ |
| २० | एक अश्रू | — | डॉ. अनिल मोरे | १८ |
| २१ | साईनाथांचा अभंग | — | श्री. बाळासाहेब बुधकर | १८ |
| २२ | तुजसाठी साई | — | सौ. शशिकला रेवणकर | १९ |
| २३ | साई दर्शन महात्म | — | सौ. प्रज्ञा ब्रीद | १९ |
| २४ | साईनाथा-साईरामा | — | सौ. मंदाकिनी इनामदार | २० |
| २५ | कुणी नसे कुणाचे | — | प्रा. प्र.के. धर्माधिकारी | २१ |
| २६ | साईविना | — | श्री. विश्वनाथ चव्हाण | २१ |
| २७ | तुजविण न आधार | — | श्री. विजय हजारे | २२ |
| २८ | साई अभंग | — | श्री. स्वामी संजयानंद | २२ |
| २९ | जा शरण साईला | — | सौ. आसावरी वायकूळ | २३ |
| ३० | श्री साई कविता | — | श्री. जगदीश देवपुरकर | २३ |
| ३१ | साई आत्मानंद | — | श्री. चंद्रकांत गरगटे | २४ |

| क्रमांक | कवितेचे नाव | | कवी-कवयित्री नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ३२ | धन्य झाले मी | — | सौ. नंदिनी बांदेकर | २५ |
| ३३ | श्री साई गझल | — | श्री. हरिभाऊ बोबडे | २५ |
| ३४ | याहो याहो साई | — | सौ. आश्विनी चिपकर | २६ |
| ३५ | प्रभु साईनाथा | — | सौ. अस्मिता दांडेकर | २६ |
| ३६ | शिळेवरी कोण बैसले | — | सौ. वसुंधरा चोरे | २७ |
| ३७ | पाठीराखा साई | — | सौ. उषा अधिकारी | २७ |
| ३८ | उठा साईनाथा | — | सौ. सुनिता सकपाळ | २८ |
| ३९ | प्रार्थना | — | सौ. भावना जेऊरकर | २८ |
| ४० | ये माझ्या हाकेला | — | श्री. बाळासाहेब नाडकर्णी | २९ |
| ४१ | शिरडीचे बाबा परमेश्वर | — | श्री. द्वारकानाथ प्रभु दाभोलकर | ३० |
| ४२ | स्वामी-गुलाब साई | — | श्री. रमेश चव्हाण | ३० |
| ४३ | साई धावा | — | सौ. सुधा गानला | ३१ |
| ४४ | श्री साई चरणी | — | आशा सरफरे | ३२ |
| ४५ | आरती | — | श्री. मधुसूदन अंबाडे | ३२ |
| ४६ | जाऊ चला हो शिरडीला | — | श्री. विलास पडवळ | ३३ |
| ४७ | गोड साईनाथा | — | सौ. मधु गायकवाड | ३४ |
| ४८ | मागणे | — | वसंत प्रधान | ३४ |
| ४९ | साईचा धावा | — | श्री. दत्तात्रय मोरे | ३५ |
| ५० | साई माझी माऊली | — | श्री. प्रभाकर कोळमकर | ३६ |
| ५१ | माझा दिवाळी दसरा | — | सौ. अनिता कोरडे | ३६ |
| ५२ | गोड तुन्ह नाम | — | सौ. लीला मराठे | ३७ |
| ५३ | मनाचे वैद्य- साई | — | श्री. प्रदीप पिरणकर | ३८ |
| ५४ | उघडले साई मंदिर द्वार | — | श्री. डी.बी. पोतनीस | ३८ |
| ५५ | साईरूप व्हावे | — | श्री. मधु पाटणकर | ३९ |
| ५६ | बाबांची मंदिरे | — | श्री. ग.दे. कुलकर्णी | ३९ |
| ५७ | तू माझा परमेश्वर | — | श्री. भास्कर जोशी | ४० |
| ५८ | साई नमस्कार | — | सौ. सिंधु सणस | ४० |
| ५९ | असो साई तव ध्यास | — | श्री. नागेश मोगलाईकर | ४१ |
| ६० | शिरडीस जाऊ | — | श्री. बी.व्ही. लांजेकर | ४१ |
| ६१ | नववर्षाचे स्वागत | — | श्री. विजय सहामते | ४२ |
| ६२ | शिरडीचा तारा मावळला | — | श्री. मोरेश्वर खेडेकर | ४३ |
| ६३ | अभंग श्री बाबांचा | — | सौ. नीला रसाळ | ४४ |
| ६४ | श्री साई स्तवन | — | सौ. शांता सरोदे | ४५ |
| ६५ | द्वारकामाईतील शिला | — | श्री. मधुसूदन करंबेळकर | ४५ |

| क्रमांक | कवितेचे नाव | कवी-कवयित्री नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ६६ | कलीयुगी अवतार | — श्री. राम धनावडे | ४६ |
| ६७ | साई होऊनी लीला गावे | — श्री. सुरेश आजगावकर | ४७ |
| ६८ | बाबांचा उपदेश | — श्री. कृ.भा. देशमुख | ४७ |
| ६९ | जेथे तुझे चरण | — श्री. बबन येरम | ४८ |
| ७० | साई दर्शन | — सौ. लक्ष्मी कानकेकर | ४८ |
| ७१ | साई हा परिसाहून महंत | — श्री. दत्ता कदम | ४९ |
| ७२ | सत् श्री साई | — सौ. कल्पना गोवेकर | ४९ |
| ७३ | श्रीसाईनाथ प्रसन्न | — सौ. अस्मिता कुलकर्णी | ५० |
| ७४ | साईबाबा | — श्री. अरविंद बारटक्के | ५० |
| ७५ | भगवंत साईनाथ | — श्री. पंढरीनाथ खर्डेकर | ५१ |
| ७६ | साईवंदन | — कु. सुधा परुळेकर | ५१ |
| ७७ | साई साई | — श्री. ग.शां. बडगुजर | ५२ |
| ७८ | साईनाथ बाबा | — श्री. मुकेश कामत | ५२ |
| ७९ | अभंग साई लीलेचा | — श्री. विलास कुलकर्णी | ५३ |
| ८० | प्रार्थना | — श्री. रा.ग. गुप्ते | ५३ |
| ८१ | श्री साईनाथ मानसपुजा | — कु. शकुंतला भोसले | ५४ |
| ८२ | धाव घ्याहो साईनाथा | — सौ. सुशिला साळुंखे | ५५ |
| ८३ | मुक्तीचा आनंद | — श्री. धोंडू पेडणेकर | ५५ |
| ८४ | पाठीराखा साई | — श्री. विजय कदम | ५६ |
| ८५ | शिरडीला जाऊ | — सौ. आशालता भालेराव | ५६ |
| ८६ | शिरडीचा मी वारकरी हाय | — श्री. विनायक ताठरे | ५७ |
| ८७ | तूच खरा आधार | — श्री. चंद्रकांत लोगडे | ५७ |
| ८८ | वर्षू दे साई कृपा धन | — सौ. नीता जाधव | ५८ |
| ८९ | साई दत्तगुरु | — श्री. मधुकर विचारे | ५८ |
| ९० | साईनाम तारिले | — श्री. बा.बा. चमणकर | ५९ |
| ९१ | साई माझी गुरुमाऊली | — श्री. सतेज पाटील | ५९ |
| ९२ | स्वार्थी भक्त देवावर रूसतात | — सौ. कल्पना पै | ६० |
| ९३ | अगाध साईलीला | — श्री. शिवानंद सावंत | ६१ |
| ९४ | बाबांची विभूती | — श्री. सीताराम पवार | ६१ |
| ९५ | माझे पुण्य फळा आले | — श्री. अशोक सातव | ६२ |
| ९६ | साईनामात दंग | — श्री. तुलसीदास कदम | ६३ |
| ९७ | साई भजन | — श्री. मोहन सोनवणे | ६३ |
| ९८ | शिरडीच्या वाटेवर | — सौ. विद्या सुलाखे | ६४ |

# श्री साईलीलाचे बारावे लेखक-कवि संमेलन

## संपादकीय



शिरडीच्या श्री साईबाबांच्या श्री साईलीला मासिकाचा हा खास श्री साई काव्य बहार विशेषांक आहे. सुमारे ९८ वर साई भक्तांनी या खास वैशिष्ट्यपूर्ण अंकातून आपली हजेरी लावलेली आहे. साई भक्तीने ओथंबलेल्या आपल्या भावना, कविता-गीते-ओळी-अभंग-श्लोक-आरती इ. द्वारे पद्यमय स्वरूपात प्रगट करून भक्तांनी जे साहित्य पाठविले त्यापैकी निवडक साहित्य वेचून ते या अंकातून भक्त वाचकांपुढे देत आहोत, ठेवित आहोत. श्री साई भक्तांची बाबांच्या बद्दलची भक्ती, श्रद्धा, प्रेम या काव्य साहित्याद्वारे प्रगट झालेली आढळून येते. गेली दहा वर्षे असा हा विविध प्रकारच्या साई काव्य साहित्याने खच्चून भरलेला अंक आम्ही अत्यादराने व भाविक श्रद्धाळू अंतःकरणाने प्रकाशित करीत आलो आहोत. यात औचित्यही आहेच. अंकाची प्रसिद्धी तारीख व संमेलनाची तारीख जवळ जवळ अगदी सारखीच येते त्यामुळे असा हा छानदार संग्राह्य अंक प्रकाशित करण्याची संधी आजवर श्री साईबाबांनीच उपलब्ध करून दिलेली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अनेक जुन्या नव्या कवींनी, देशातल्या अधिकारी, सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित व्यक्तिंनी या अंकातून आपली हजेरी लावलेली आहे, आपली लेखणी चालविलेली आहे, श्री बाबांवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे. काव्य साहित्य सरितेने भरलेला, वाहणारा असा हा आगळाच अंक आहे. अगदी मराठी मासिकांच्या क्षेत्रातलासुद्धा. श्री बाबा या एकाच विषयावर भरपूर कविता प्रसिद्ध करणारा हा अंक असल्याने असंख्य भक्तांनी यापूर्वीच या काव्यबहार अंकाची वारेमाप स्तुती केलेली आहे. मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. श्री बाबांच्या या नाविन्यपूर्ण मासिकाला भक्तांची अशी पावती मिळत गेलेली आहे. यंदा लेखक-कवि-भक्त मंडळींबरोबर श्री साईबाबा संस्थानची मान्यवर विश्वस्त मंडळीही मोठ्या प्रमाणावर या प्रसंगी हजर रहात आहेत व त्या सर्वांच्या उपस्थितीत या अंकाचे प्रकाशन होत आहे हा खरोखरीच आंनदाचा योग आहे.

या बाराव्या संमेलन प्रसंगी आम्ही सर्वांचे स्वागत करतो व श्री साईनाथांनी हे संमेलन सुखरूपपणे यशस्वी पार पाडून न्यावे अशी प्रार्थना करतो.

# श्री साईलीला लेखक-कवी संमेलनाची १२ वर्षांची वाटचाल

| क्रमांक | वर्ष | सन्माननीय अध्यक्ष | सध्या हयात |
|---|---|---|---|
| १ | १८-१९ जाने. १९७५ | - श्री.एन.जी. उर्फ भैय्या साहेब अवस्थी, पुणे - | हयात नाहीत |
| २ | १९७६ | - डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर, कुर्ला - | हयात नाहीत |
| ३ | १९७७ | - श्री. अनंत जयदेव उर्फ दादासाहेब चितांबर, नगर - | हयात आहेत |
| ४ | १९७८ | - श्री. गणेश जयदेव उर्फ अप्पासाहेब चितांबर, नगर - | हयात आहेत |
| ५ | १९७९ | - डॉ. गजानन गोविंद उर्फ अण्णासाहेब दाभोलकर, वांद्रा - | हयात आहेत |
| ६ | १९८० | - श्रीमंत अनुबाई वहिनी साहेब घोरपडे, इचलकरंजीकर - कोल्हापूर | हयात नाहीत |
| ७ | १९८१ | - सौ. सरोजिनी भास्करराव मुळ्ये, इंदूर- | हयात आहेत |
| ८ | १९८२ | - श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने, पुणे- | हयात नाहीत |
| ९ | १९८३ | - डॉ. श्री राजाराम सीताराम कापडी, कोल्हापूर- | हयात आहेत |
| १० | १९८४ | - श्री. लक्ष्मण सदाशिव नाईक, इंदूर -, | हयात आहेत |
| ११ | १९८५ | - श्री. वसंतराव लक्ष्मण पोतदार, सांताक्रूझ - | हयात आहेत |
| १२ | | - संमेलनाची मुहूर्तमेढ<br>- मा. कोर्ट रिसिव्हर श्री. का.सी.पाठक साहेब. | |
| १३ | | संमेलनाला गती देऊन परंपरा कायम ठेवली<br>- मा. रिसिव्हर श्री. क.हि. काकरेसाहेब व रा. द. बन्नेसाहेब | |
| १४ | | संमेलनाची गेली बारा वर्षे कार्यवाह<br>- सदानंद चेंदवणकर का. संपादक श्री साईलीला | |

# साई रामायणाचे पद —

[बाबांच्या एका भक्ताची, लोहाराची बायको भट्टीजवळ बसली होती. नवऱ्यानं हाक मारल्यामुळे भट्टी सोडून ती दूर गेली तेवढ्यात तिचं तान्हं बाळ जळत्या भट्टीत पडणारं होतं. बाबांनी अंतर्ज्ञानानं हे ओळखून द्वारकामाईतील धुनीमध्ये हात घालून बाळाला वाचवलं. काही झालं तरी बाबांची मुलं बाळ, नातवंडं, पतवंडं, यांच्या कडे बाबांचं, मायेच्या माऊलीचं आजोळातून कसं लक्ष असतं याची प्रचिति आली. या भक्त लोहाराचे मनोगत कसं असेल त्याचे वर्णन या कवितेत केलेले आहे.]

माजी लगीन बायकू। माज्या बाबाचीच ल्येक।
आम्हा पोटची पोरटी। नातवंड त्या अनेक — ॥१॥
माजी बायकू हट्टाने। जाई शिर्डी माथराला।
तिनं साई आशिर्वाद । घरा आहेर आणिला — ॥२॥
पोट्टी धट्टी कट्टी माजी। तशी जन्मजात हट्टी।
त्यांना धड धड वाटतं । माझ्या संसाराची भट्टी — ॥३॥
हट्ट करता बाबा हाती। त्यान्नी मिळतो प्रसाद
त्याच प्रसादाची लालूच। आजोबाला घाली साद — ॥४॥
आजोबाच्या घरी जाया। घेती एकनेक नाद
आजोळीच्या आनंदाची। घरी आबादी आबाद — ॥५॥
संसाराच्या धगी मधी। जीव धावला पडला
शिर्डीतल्या आजोबानं। तिथं आकांत मांडिला — ॥६॥
हात भाजून घेतला। जाता जीव वाचवीला
संसाराचा सोस त्रास। तिथं साईन सोसला — ॥७॥
जवा संव माहेराची । आली बाबाच्या लेकीला
माहेराची माय साई। तवा धावली हाकेला — ॥८॥
धरे माहेराची वाट। साई कशी तातातूट
सासरात माहेराची। गोडी अवीट अवीट — ॥९॥
लेक धावली धावली। म्हणे माय आठवली
तिथे दाराशी माऊली। उभी पहात वाटुली — ॥१०॥
कशी हायेस तू बेटी। कशी माझी सारी पोट्टी।
भरे माहेराची मठी । अब्बाजान सांगे गोठी — ॥११॥
काय खाऊ गे आणीला। माय पुसते लेकीला।
विसरली माझी बाय। येता माहेर वाटेला — ॥१२॥
तुझ्या अंगाखांद्यावर। बाळ गोंडस गोजिरं
मुका घेत माय म्हणे। तुमी माजीरं माजीरं — ॥१३॥

— प्रा. डॉ. मा. चिं. दीक्षित
१२०६/३२अे, शिरोळे मार्ग, शिवाजी नगर, पुणे ४

# तव पदीचा जोडा

तू होतास मानव देहधारी
मी होते कारे शिरडी नगरी
असेन कारे छोटी चिमणीं
चिव चिव करत गात तव अंगणी
की होते छोटी बालीका
खुडूनी तव हाती देत होते कलिका
कां असेन रे मी तव चरणीची माती
म्हणूनी जडली या जन्मी तुजवरी प्रिती
तव हातीचे धुनीतले असेन लाकूड
तरीच मज लागले तुझेच वेड
की होते तव करकमलातील चिलीम
म्हणूनी करितोस मजवरी तू प्रेम
असेन खास तव पदीचा जोडा
साई तुजसाठी सुमनचा जीव झालारे वेडा

— **डॉ. सुमन खानवीलकर**
सीता कुंज, लोणावळा

# भक्ती सूराच्या तालावर

भक्ति सूराच्या तालावर मी स्वच्छंदे नाचतो!
मनाने साई-कृपा याचितो!!
श्रद्धा-मंदिर चित्ती उभवुन
सद्‌गुरु मूर्ती सुंदर स्थापुन
अनन्यभावे सदैव साई-किर्तनात रंगतो ॥१॥
तिमिर नाशण्या भव-मायेचा
दीप उजळुनी शुद्ध मतीचा
धूप जाळण्या धन-लोभाचा साईला प्रार्थितो ॥२॥
संसाराचे तोडुन बंधन
अखंड करि जे साई-चिंतन
भवोदधीतून आर्त भाविका सदैव तो रक्षितो ॥३॥
सदा करी जे साई-भक्ती
परी न इच्छी अन्ती मुक्ती
असेच साधक साई-दयाधन वात्सल्ये तारितो ॥४॥

— **डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश'**
'सौजन्य' शिवाजीनगर, नागपूर १०

# विश्रांती

करुनिया कष्ट, सुखी दोन वेळ।
सर्व कांही बाबा, तुझ्या कृपेचाच खेळ॥
प्रेम भावनांनी पूजीते मी तुला।
कर्तव्याची सोस मार्ग दावी मला॥
बंद नयनांत दिसे तुझीच पाऊले।
तव चरणी वाहीन, दोनच अश्रु फुले॥
संपले माझे अश्रु, संपल्या भावना।
हळवे माझे मन, काय करु, सांगना?॥
पदर पसरिते देई मला शांती।
उरली एकच आशा, तुझ्या चरणी विश्रांती॥

**— डॉ. सौ. मालतीबाई राहाटे**
मेडिकल ऑफिसर सामान्य रुग्णालय,
मु.पो.ता. भंडारा

# साई स्मरण

हात जोडिते वंदन करिते
श्रद्धेने मी तुजला नमिते
साई नाथा झडकरी आतां
सोडवी भवपाशांतुनिया आता
आस नसे मज अन्य कशाची
नेई मजला तव चरणांसी
भक्तीनें मी तुला पूजिते
श्रद्धेनें मी सबुरी धरिते
जे जे वांछी ते ते मिळते
साई-स्वरुप समोर दिसते
प्रातः काळीं तुझे स्मरण मी सदैव ही करिते
तुझ्या स्मृतीने मनही माझे प्रफुल्लित होते
साई नाथा मजला देई आशिर्वचनाला
विसर न व्हावा तुझा कधी, ही आस मजला

**— सौ. सरोजिनी मुळ्ये**
६ नाथ मंदिर कॉलनी इंदूर

# श्री साईचा दास

ना मी पंडीत बुद्धीमान
नाही मी शहाणा
नाही कल्पना ना कल्पक बुद्धी
हे जाणूनी मन होय दुःखी।
पण हे सौख्य काय कमी आहे
क्षणात साई दरबारी मन माझे जाय
जरी मी अनपढ बुद्धीहीन
त्याचेही मज अभिमान
म्हणूनी म्हणवितो मी साईचा
अनपढभाई बटूछाप
विनम्रपणे नमितो 'युवराज' आता
साई देवा हा दास पदरी घ्यावा।

**— डॉ. वाय. एन. हिबारे**
सिंगार बाग घर नं. १-८-८५
पोस्ट बीदर जिल्हा बीदर
कर्नाटक ५८५४०१

●

# आई

हाक मारुनी पहा एकदा साईला आई
आत्म तेजा उजळूनी जाईल तू एकदा पाही।

जगी नाही कुणी कुणाचे नाही सगे सोयरे
नाते गोते सारे एकची तो साई जाणेरे॥

नको थांबू कुणासाठी तू जा शरण आईला।
नको करु विचार कुणाचा आठव तू साईला॥

जागे होण्या सांगे आई जागवुनी सद्‌बुद्धीला
जन्माचे जे अंतिम ध्येय जाणतू परमात्माला॥

करु नको तू आशा फळाची सतत सेवा करीत रहा
केले काहीं तू या जगती ते साई चरणी वहा॥

होईल आत्मोद्धार तुझा रे जाता शरण आईला
अंतीम समई तूच असावा ध्यानी विनवी इंदू साईला॥

**— डॉ. इंदू नाईक**
लोणावळा

# तू असता समर्थ पाठीराखा

मी उभी तव दारी, घेऊनी पांगुळगाडा
शक्ती नाही परी, मला पुढे ढकलण्याला
लटपट पाया करती चालला गाडा
सांभाळी गा, आता मला बालका ।१।
तुझ्याच प्रेरणेने पडती पाऊले माझी पुढे
ये सत्वरी तू चुकली जर वाट कुठे
दे अभय मला आले अरिष्ट जर आडवे
सद्‌चिद्‌नन्द तू जाणतोस भावना ।२।
तू अनंत, अनंत रुपे तुझी विश्वचिया
जिथे तिथे तूच तू आहेस अनंता
कां उगाच शंका मनांत घाली पिंगा
करुणा करा; तू असता समर्थ पाठीराखा ।३।

— **सौ. शकुंतला शंकर जगतकर, एम.ए.**
१९/१६२ उन्नत नगर, गोरेगाव, मुंबई-६२

# शिरडीश्वर मज हाति धरा

शिरडीसाई प्रभु कृपा करा - शिरडीश्वर मज हाति धरा।
श्यामसुंदरा इंदिरावरा - शंखचक्रधर दया करा।
शिरडीनिवासी कृपा करा - द्वारानिलया हाति धरा।
गोदावरीतट मंगल चरणा - फकीररुपा दया करा।
कृपा सागरा कृपा करा — प्रेम स्वरूपा हाति धरा।
श्रद्धा सबुरी-कंपित-अंतर - युगावतारा दया करा।
संकटनाशन कृपा करा - लीलाधर प्रभु हाती धरा।
भक्ति रसांकित प्रेमळमूर्ती - विश्वाधारा दया करा।
अशरण शरणा कृपा करा - करूणामूर्ती हाति धरा।
अनंत कोटी ब्रह्मांडातुन - उजळत ज्योती दया करा॥

— **श्री. चकोर रा. आजगांवकर** एम.ए.
(उप सचिव, अर्थ खाते, महाराष्ट्र शासन)
वाय् ११/१७० सरकारी वसाहत
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

# आशीर्वाद असु द्यावा

(श्री. नानासाहेब रासने यांचे प्रती श्रद्धांजली)

नाना नाना हाक मारीत होते,
पूर्वी उत्तर देत होते
शिव्या देत म्हणत होते,
"बाबांची आठवण कर"
"माझा बाबा बेफिकर आहे
फकिर नाही"।
नाना आता बोला ना
बाबाकडे गेलात ना
आम्हाला सोडून
नाना आम्हाला कधी नेणार
बाबा गेले तरी
तुम्हाला पाहून आम्ही जगत होतो
जाऊना या नाना
आम्हा साई लेकरुना विसरु नका
बाबा ना सांगा
तुमच्या लेकराना बे फिक्र करा म्हणून
बर नाना
प्रेमाचे अश्रु घेऊन जा,
आशीर्वाद असु द्यावा नाना

**—सौ. मीरा नाईक**
पन्साल तालीम, बीदर

# कलीयुगाचा देव

देव कसा कोठे आहे, ठाऊक ना तुला मला
"साई-साई" मंत्र-घोष हा करील मार्ग मोकळा ॥धृ.॥
साई जपतां, नासाग्री चित्ता।
देव दिसे बिंदुरूप।
पाहिले न कोणी अद्‌भुतकरणी
असले आगळेची रूप

दिसे अंतरी, भिन्न रूपाची वलियावरी वलये।
योगी म्हणे नसे वलयेति स्वरूपांची आगळी आत्मरूपे
देव कसा कोठे आहे, ठाऊक न तुला मला
साई साई मंत्र घोष हा करील मार्ग मोकळा॥

**— डॉ रा. सी. कापडी**
राजारामपुरी, कोल्हापू

# अहोभाग्य!

जाईन मी शिरडी जाईन।
श्रद्धा माऊलीचे दर्शन घेईन।
भेटण्याची भूक जाईल हरपून।
साकार निराकाराचे होईल दर्शन।
जय साई विठ्ठल जय साई विठ्ठल।१।
समाधी मंदीरांत बसू जावून।
दोन्ही हाताच्या टाळ्या वाजवून ।
टाळ वीण्याचे नाही कारण।
गोचर अगोचराचे होईल दर्शन।
जय साई विठ्ठल जय साई विठ्ठल।२।
साई समाधी वर चढून।
बाबा-चरणावर भार ठेवून।
मनातील दुःखे त्यांना सांगून।
स्थल सूक्ष्माचे होईल दर्शन।
जय साई विठ्ठल जय साई विठ्ठल।३।
सुगंधित होईल माझे मन।
प्रेम-दाव्यानं त्याला बांधिन।
कृपा रसाचा प्याला प्राशीन।
सगुण निर्गुणाचे होईल दर्शन।
जय साई विठ्ठल जय साई विठ्ठल।४।

**– प्रो. एच.बी. महाले**
अध्यक्ष, गणित विभाग
ज.ह.शासकीय महाविद्यालय,
बैतूल, म.प्र.

# सोने होणे हेच म्हणा की

असू कशीही काळीबेरी
रूप न कोणा हाती
हाच दिलासाः झाली आम्हा
नरदेहाची प्राप्ती!— ॥ १ ॥
नसे संपदा सत्ता विद्या
कोण कशासी पुसती
कृपा हीच की : संगत जडली
एकांताची पुरती!—॥ २ ॥
तोंड असूनी मुकी बिचारी
कानहि झाले भिंती
भाग्य हेच की : हरिनामास्तव
व्याकुळ झाली वृत्ती!— ॥ ३ ॥
खुळे बावळे ध्यान अशांसी
सखे-सोबती नसती
दया हीच की : घेती प्रेमे
संत आपुले पंक्ती!—॥ ४ ॥
ऐहिक सगळे तुटक्या रेषा
खणा कितीही... माती
सोने होणे हेच म्हणा की—
पडलो संतांहाती!— ॥ ५ ॥

**— प्रा. र. श्री. पुजारी**
रमानिवास, ९९२ सदाशिव, पुणे-३०

# प्रभु साईनाथा

प्रभु साईनाथा, प्रभु साईनाथा
किती कशी गावी, तुझी दिव्य गाथा.

तुझाची आधार, आम्हा अनाथा
प्रेमाचा सागर, तूची जगन्नाथा

कशी आळवू ही, भक्ती तुझी मी
अधुरी रे आहे, माझी बाल बुद्धी.

डोळा आवडे हे, तुझे रुप फक्त
मानुनी घे हा माझा, भोळाभाव भक्त

तूचि सांभाळ, या आता पामराला
क्षमा असू द्यावी, तुझ्या लेकराला.

तुझी कृपादृष्टी मागते मी नित्य
घडो द्यावी सदा भक्ती उदात्त।

चुकल्याची क्षमा, तुजपाशी आहे
श्रद्धेसह गाते, आज मी हे गाणे.

शिरडीचे स्वामी तुमची मी दासी
लोटू नका मज, केव्हांही माघारी।

**सौ. वासंती नांदेडकर, एम्.ए.**
१४०/४७४. नेहरु नगर,
कुर्ला (पूर्व) मुंबई ४०० ०२४

●

# अवघा आनंदी आनंद

रुप साईचे सावळे
भवदु:ख सारे पळे ॥१॥
साई विठ्ठल सावळा
सर्व सुखाचा सोहळा ॥२॥
साई विठ्ठल रखुमाई
ज्ञाना-नामा जनाबाई ॥३॥
साई माझा हरिगोविंद
वाचे जडो साई छंद ॥४॥
मन होई साईमय
अवघे तुटतील अपाय ॥५॥
मन जपो साईनाम
अवघे विश्व मनोरम ॥६॥
साई आनंदाचा कंद
भरला जीवनी आनंद ॥७॥
मन जडो हाची छंद
(मग) अवघा आनंदी आनंद ॥८॥

— **श्री. राम झरेकर**
भोईर नगर-दहिसर पूर्व
मुंबई नं. ४०० ०६८

# सबका मालिक एक है

''सबका मालिक एक है'' सांगुन गेले साई
माणूस माणूस एकच आहे सारे भाई भाई ॥ धृ. ॥
प्रत्येकाचे स्वरूप एकच एकच मानवजाती
प्रत्येकाच्या अंतःकरणी परमेशाशी नाती
प्रत्येकाचा धर्म शोधितो 'दिशांत मालिक दाही' ॥१ ॥

चंद्र सूर्य नक्षत्रें आणि थंडी पाऊस ऊन
पीक आणखी पाणी वारा ही सृष्टी व्यापून
प्रत्येकाला जगात साऱ्या समान मालिक देई ॥२ ॥

देवालय प्रार्थना मंदिरे बांधून मस्जिद कोठे
मालिक कां बंधनात राही स्वरूप ज्याचे मोठे
खुज्या मनाला अपुला मालिक अजुन कळला नाही ॥३ ॥

जगांत जन्मा आली दैवे एकच मानवजाती
प्रत्येकाच्या मुठींत बांधुन कर्म दिले या हाती
वर्ण भेद वा धर्म भेद हे मालिक जाणत नाही ॥४ ॥

— श्री. कृ. व्यं. हवालदार
गंगाधर निवास, जयचामराज नगर, हुबळी

# श्री साई दर्शनाची ओढ

साई माझी माता साई माझा पिता
साई दुःख हर्ता दुःखीताचे
साई माझा बंधू साई माझी बहीण
साईविण दूजे नाहीं कोण
साई, साई साई ध्यानी मनी साई
दामू म्हणे साई दर्शना बोलावून घेई

—श्री. दामोदर पद्मन पाटील
मु. रामबाग, पो. आगरवाडी
ता. पालघर, जि. ठाणे पीन. ४०११०२

# एक अश्रू

[श्री साई सच्चरित १ अध्यायावर आधारित]

केळीच्या पानांवरून ओसंडणाऱ्या
पाण्याच्या थेंबाप्रमाणे एक अश्रू--
साईच्या डोळ्यात टपकला
अन् बाबा माझा जात्यावर बसला
गावात आली महामारी
तेव्हा तत्पर माझा नाथ
भरडावया ती रोगराई
खुंटीवर बाबांचा हात ॥
सुपभर दळणानं
महामारीच्या पळण्यानं
गाव रोगातून मुक्त झालं
बाबांची हि किमया वाचून
माझ्याही डोळ्यातून एक अश्रू टपकला--
अन् साई चरणी तो विलीन झाला ॥

—डॉ. अनिल मोरे, मुंबई

# साईनाथाचा अभंग

धन्य धन्य श्री साईनाथ
अनाथांचा, नाथ, तूची दिनानाथ ॥धृ॥
घालुनी लोटांगण वंदिले तव चरण
देहभान विसरले चिंतिता तव स्मरण ॥१॥
शिरडी नगर जैसे विठ्ठलाचे पंढरपूर
अखंड नामाचा गजर चाले सर्व प्रहर ॥२॥
ऐसा तव महिमा, त्यासी नसे सीमा
नित्य वसो तव प्रतिमा मम हृदयी ॥३॥
तुज मागणे नलगे मजला, नलगे मजला
सदैव साथ दे आम्हाला
हीच विनंती करितो नाथा
धन्य धन्य श्री साईनाथ श्री साईनाथ ॥४॥

—श्री बाळासाहेब बुधकर
जीवन निवास रामवाडी नौपाडा ठाणे

# तुजसाठी साई

तुजसाठी साई, गुलाब पुष्प मी होईन रे
पायदळी तुझ्या चिरडून धन्य मी होईन रे ॥१॥
तुजसाठी साई भ्रमर मी होईन रे
भावगीतांनी कानात तुझ्या हितगुज मी करीन रे ॥२॥
तुजसाठी साई सरिता मी होईन रे
स्नानास तुझ्या काट्याकुट्यातुन वाहत मी येईन रे ॥३॥
तुजसाठी साई तरुवर मी होऊन छाया मी देईन रे
सुकले तरी धुनिमाईत जळून उदिरूपे मी राहिन रे ॥४॥
तुजसाठी साई ज्योत मी होईन रे
जळत जळत प्रकाश देवून तृप्त मी होईन रे ॥५॥
तुजसाठी साई फुलपाखरु मी होईन रे
फुलाफुलातील जमवुनी मध मुखी तुझ्या घालीन रे ॥६॥
तुजसाठी साई अगरबत्ती मी होईन रे
जळता जळता सुगंध तुज मी देईन रे॥७॥
तुजसाठी साई पवन मी होईन रे
निरोप तुझ्या भक्तांना त्वरीत मी देईन रे॥८॥
तुजसाठी साई चंदन मी होईन रे
झिजता झिजता ही शशी तुझ्याच चरणी लीन राहिल रे॥९॥

— **सौ. शशिकला रेवणकर,**
कुंटोली अंबरनाथ

# साई दर्शन महात्म

शिर्डीस जाऊन दर्शन घेऊन
मन तृप्त होते भक्त जनांचे
घेतात पाहून डोळेच भरुन
वदन सुन्दर साईबाबांचे ।१।
काकड आरती होते सकाळी
मध्यान्ह आरती होते दुपारी
सांज आरतीची गडबड भारी
शेजारतीची सर्वांना गोडी ।२।

आरती मध्ये भक्त गुंगती
त्यातून होते मनाची शांती
भक्ताला वाटे शिर्डीस आलो
साईदर्शनाने पावन झालो ।३।

गुरुवारचि गर्दी वर्णावी किती
जागेची होते मोठी पंचायती
बाबांची येते भक्तां प्रचिती
भक्तांना वाटेना कसली भयभीति ।४।

असे बाबांचे सत्व महान
भक्त जनांना करते बेभान
त्यातच वाटे भक्ता सन्मान
शिर्डीस बाबांचे घेऊन दर्शन ।५।

— **सौ. प्रज्ञा शां. ब्रीद**
२६ नवयोजना सदन
ताडदेव, मुंबई ३४

# साईनाथा-साईरामा

साईनाथा, साईरामा, साईनंदा, सच्चिदानंदा,
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
साईभक्ती, साईशक्ती, साईस्वरूपा, पूर्णानंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
दिनदयाळा, कृपासागरा,भक्तरक्षका ब्रम्हानंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
त्रिभुवनपालक, जगदुद्धारका, गिरीजानंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
साईमग्न, साई मया, राधाकृष्ण, स्वामी गोविंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
साईध्यान, साईनाम, चिदानंदा, माधव मुकुंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-
साईबाबा, राधाकृष्णा, परमानंदा, गोपाल-मंदा
सद्‌गुरू श्री साई पादानंदा-

— **सौ. मंदाकिनी इनामदार**
स्नेह सागर, प्रभादेवी, मुंबई.

# कुणी नसे कुणाचे

कुणी नसे कुणाचे
जगी या —
जन हे सुखाचे
दिल्या घेतल्याचे
कुणी नसे कुणाचे....
वाटते मला आज
नातेवाईक माझे आज
संकट समयी
साथ न देई
कुणी नसे कुणाचे...
पैसा असता
या या म्हणती
पैसा नसता
कुणी न पुसती
कुणी नसे कुणाचे....
जगी या धन
श्रेष्ठ असे
माणुसकीची उणीव भासे
कुणी नसे कुणाचे

**— प्रा. धर्माधिकारी प्र. के.**
मसूर

# साईविना

गुरु विना नाही भलं
साई विना नाही फळं १
आत्मा विना नाही काया
साई विना नाही माया २
भक्ती विना नाही शक्ती
साई विना नाही मुक्ती ३
निश्चया विना नाही मनी
साई- विना नाही धुनी ४
तेला विना नाही ज्योती
साई विना नाही पोथी ५
वृक्षा विना नाही सावली
साई विना नाही माऊली ६
सबुरी विना नाही गोडी
साई विना नाही चावडी ७
श्रद्धे विना नाही साक्षात्कार
साई विना नाही चमत्कार ८
रामा विना नाही रामायण
साई विना नाही भक्तगण ९
उदी विना नाही काही
शिरडी विना नाही साई १०

**— श्री. विश्वनाथ सदाशिव चव्हाण**
कमल निवास, क्वॉरी रोड,
भांडूप (पश्चिम) मुंबई - ४०० ०७८

# तुजविण न आधार

यत्न करूनी थकलो आतां
तुजविण न आधार.... साईनाथा ।धृ.।
शिरडी येतां, करी तो प्रार्थना
पुरविशी तू, येअी जे मना
अिथेच परि कां, ये अडथळा.... ।१।
तुझ्या पासूनी लपे न काहीं
जाणतोस तूं, सर्वची काही
गळूं दे अहंकार...साईनाथा... ।२।
भार वाहशी, तूं सर्वांचा
गरीबांचा अन् श्रीमंताचा
घडू दे साक्षात्कार...साईनाथा... ।३।

**— श्री. विजय द. हजारे एम.ए.**
सी/६ गुंफादर्शन. बोरीवली पूर्व
मुंबअी नं.४०० ०६६

# साई अभंग

साईच्या दरबारी। उभा क्षणभरी
त्याने श्रद्धा सबुरी, साधियेली ।धृ।
बसला दगडावरी,। ठेवून पाय पायावरी
दृष्टी भक्तांवरी, ठेवूनिया ।२।
मागणे सदा रातसंग ।साई भजनी चढो रंग
मुखी साई अभंग, रात दिन ।२।
शरीर अंती माती ।अनेक येती जाती
जन्म जन्माचा साथी, साई माझा ।३।
जन्मोजन्मी संस्काराने ।साईचरण मिळणे
संजयानंद दास म्हणे, भाग्य लागे ।४।

**— श्री स्वामी संजयानंद**
श्री सर्वेश्वर रघुनाथ मंदिर माउन्ट आबु
जिल्हा-सिरोही राजस्थान

# जा शरण साईला!

श्रद्धा सबुरी तत्त्वप्रणाली साईवचने पाळा
जा शरण साईला जा शरण साईला ।धृ।
शरण आला वाया गेला ऐसा नाही कोणी
साईला तू भज रे मानवा काया वाचा मनी
चहुकडे हा उभाच साई जपा रे साईमाला
जा शरण साईला जा शरण साईला ।१।
देह जरी हा टाकून गेलो उभा मी सर्वांपाठी
दर्शन देईन म्हणे साई हा माझ्या भक्तासाठी
अल्ला सबका भला करेगा स्मरा साईवचनाला
जा शरण साईला जा शरण साईला ।२।
सबका मालिक एक रे बाबा सांगून गेले साई
उदीस भाळी लाव मानवा सांगे मशिद माई
साईबाबा जो सकलांचा साईग्रंथ तो चाळा
जा शरण साईला जा शरण साईला ।३।

**— लावणीसम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ**
संगीत विशारद, इ-९/८ बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम). मुंबई ४०० ०८४

# श्रीसाई कविता

ऐलतीरी पैलतीरी
माझ्या साईचे गाव
द्वारकामाई असे तेथे
ज्याचे शिर्डी आहे नाव-

बाबांचा चेहरा
जगाचा आरसा
महाराष्ट्राच्या भूमीला
भक्तीचा वारसा

साईनाम! भक्तीधाम
मुखी राम हेच काम
रक्षणास दुर्बलास
येई काम 'साईनाम'

**— श्री. जगदीश देवपुरकर**
मिशन कंपाऊंड, धुळे ४२४००१

# साई आत्मानंद

शिरडी नगरीत साई आत्मानंद
दरवळे त्रिभुवनि किर्तीचा सुगंध ॥धृ॥

पावन करूनि, शिरडी स्थान
उतरले भू-वरि, आदी नारायण
द्वारकामाई, मंगल भुवन
वसले साई करण्या, भक्त रक्षण
भाव भक्तीचा, मळा प्रकटून
सुटले वैरत्वाचे, निजबंध ॥१॥

आसन करूनि, निंब स्थान
बैसले द्वादश वर्षे, धरूनि मौन
निंबातळी गुरूचे, समाधी स्थान
परम पित्याला, पहीला मान
बालक गोंडस, देखुनि सर्वजण
हळहळले मनी, पाहुनि बालमुकुंद ॥२॥

कारण होऊनि, चांद यवन
घडले येथेचि, सारे रामायण
योग येऊनि, विवाह बंधन
आले साई, वऱ्हाडी मिळून
दिव्यत्वाचे, तेज पाहून
जाहले कुंठीत, अवघे विश्वानंद ॥३॥

क्षालन करूनि, दुःख दैन्य
केले अवघे, आनंदी जन
कलीयुगामधे, अवतार घेऊन
तारीले तयांनी, भारत भुवन
समता बंधुत्वाची, देऊनि शिकवण
सांधले तयांनी, जनी ऋणानुबंध ॥४॥

— **श्री. चंद्रकांत गरगटे, बी कॉम. एल.एल.बी.**
'साईकृपा' ३९९ गुरुवार पेठ, सातारा

# धन्य झाले मी

वाटले होते अभागी मी,
जेंव्हा हरवले पितृछत्र
वाटले, किती सुखी मी
जेव्हां धरले बाबानी छत्र
बाबा तुझ्या कृपेमुळे
धन्य झाले मी
तृप्त झाले मी
रामासारखा साथी जीवनी
मिळाला तुझ्या कृपेमुळे
फळही फलले अंगणी
तुझ्या कृपेमुळे
धन्य झाले मी
तृप्त झाले मी
राहीन सदा ऋणी
तुझ्या चरणी
धन्य झाले मी
तृप्त झाले मी.

— **सौ. नंदिनी रमेश बांदेकर**
३६ फॅारेस्ट क्वॅार्टर्स,
मु. पो. धारवाड, ५८०००८

# श्री साई गझल

दुःखीतांचे दुःख मी ह्रदयात माझ्या साठवितो ।
अश्रू त्यांचे झेलूनी मी भार त्यांचा साहतो ॥१॥
भूक आहे पोटी त्यांच्या जठराग्नी पेटलेला ।
झोप त्याची उडाली नीत जागा राहतो ॥२॥
अन्धार दूर पसरला रस्ता कुठे ना दिसतो ।
ठेचाळले हे चालणारे रक्तपूरही पाहतो ॥३॥
पुरे झाले टोचणे रे अन्त कुठवर पाहतो ।
न्याय कोठेच नाही अन्याय आम्ही साहतो ॥४॥

— **श्री. हरीभाऊ बोबडे** एम.ए.बी.एड.
अंजनसिंगी

# याहो याहो साई

याहो याहो साई मनात,
अनुभव द्या हा जनांत
कृपा तुमची आहे अनंत
राहो ती नित्य आम्हावरी ।।

तुमची माया अपरंपार
नित्य तू आम्हा तार
जशी चिमणी पाखरं
तशी आम्ही लेकरं तुझी ।।

तुम्ही जनांचे कैवारी
माय बाप श्रीहरी
दिन दुबळ्यांना वारी
तारी आम्हा पिडीतांना ।।

साईनाथा साईनाथा
तुमच्या चरणी ठेविते माथा,
नित्य गाईन तुमची गाथा,
न्या या अनाथा पैलतीरा ।।

साई माय माऊली
तू कृपेची साऊली
सद्‌बुद्धी दे या मुली
चरणरजधुळी लावीते माथा ।।

या कुणीही दादा ताई
जवळ करी "द्वारकामाई"
पसा भरभरूनी देई,
प्रसाद उदीचा ।।

**— सौ. अश्विनी अ. चीपकर,**
न्यु.बीडीडी चाळ नं. १०/४८
नायगाव, मुंबई - १४.

# प्रभु साईनाथा

प्रभु साईनाथा प्रभु साईनाथा ।
शरण मी आले रे तुज दिनानाथा ।
लोटु नको रे दूर तु मजशी ।
देई ठाव रे तव चरणाशी ।
किती करू रे तव आळवणी ।
दाटे डोळा बघ रे पाणी ।
मूर्ती तुझी रे गोजिरवाणी ।
साठूनी राहे रे अंतःकरणी ।
अखिल जगाचा तुच नियंता
प्रभु साईनाथा । प्रभु साईनाथा ।। १ ।।

जळी स्थळी वा काष्ठी पाषाणी ।
अखिल चराचर तु व्यापिशी ।
कधी तू मुंगी अथवा माशी ।
कधी श्वान वा सुकराशी ।
विविध रूपी विविध वेषी ।
कसा कुठे ही तू प्रकटशी ।
पंचभूता वरही चाले तुझीच सत्ता ।
प्रभु साईनाथा । प्रभु साईनाथा ।। २ ।।

जागृतीत अथवा स्वप्नी ।
गर्जे तुझी अशरीर वाणी ।
व्याघ्रराज अन् नागराज ।
धाके भूलती अपुलाले काज ।
अनुभूती ती नित नवलाई ।
न्यूनता न कधी लवलाही ।
किती पाहु अन् कशी रे साहु तुझी दूरता ।
प्रभु साईनाथा । प्रभु साईनाथा ।। ३ ।।

**— सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर**
६९ बी. खाडिलकर रोड
गिरगांव मुंबई - ४०० ००४.

# शिळेवरी कोण बरे ते बैसले

लेंडीबागी शिळेवरती कोण बरे ते डुलत बैसले
अन् तेच तपस्वी मम निंबवृक्षातळी दिसले
मजवाटे गतजन्मीचे आज पुण्य फळा आले
पाहुनी ती पुज्य चरण कमला कर माझे जुळले
रात्रंदिन स्वप्न जागृतीत मी तुम्हां सदैव पाहीले
पाहुनी ते ममतेचे मूर्तरुप मन कसे बरे मोहरले
नेत्र नजरेने मग आपुले अनुपम मिलन की झाले
तत्क्षणी हे संसार सुखाचे बंधन मी त्यागीले
स्वयं देहभान हरपुनी साई सेवेमधे रंगले दंगले
"श्रद्धासबुरी" अमृत मंथन प्राशन हो केले
साईहस्ते भाली उदी लावण्याचे भाग्य मला लाभले
तथास्तुने मोक्षमुक्तीचे आशिश त्यांनी मज दिधले

**— सौ. वसुंधरा रामराव चोरे**
८०३ सी लक्ष्मी भुवन
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुं. १४

# पाठीराखा साई

जीवन झाले होते सहारा
कोणीच देत नव्हते थारा
पण काय सांगू चमत्कारा
प्रभु साईने दिला आसरा।
आई बाप मरुन गेले
कुणी मायेचे नाही उरले
साईला ते कळुनी चुकले
मायेने पोटाशी धरुन कुरवाळले।
त्याच क्षणी तुटले पाश
वाटले होऊं दे कितीही विनाश
कशास व्हावे आता निराश
पाठीशी साई पुरातन ब्रह्म अविनाश।

**— सौ. उषा अधिकारी**
सावित्री सदन, बंदर रोड रत्नागिरी

# उठा साईनाथा

उठा साईनाथा आता
दर्शन द्या सकला
झाली पहाट आता
सरली निद्रेची वेळा ॥ उठा ॥
प्रसन्न होऊनी दावा आम्हां
स्नानाचा सोहळा
दावा स्नानाचा सोहळा ॥उठा ॥
दर्शनार्थ हो तुमच्या अमुचे
प्राण आले गळा
अमुचे प्राण आले गळा ॥उठा ॥
एकटीच मी नाही येथे
झाले सगळे गोळा
आता झाले सगळे गोळा ॥उठा ॥
उशीर का हो करता आता
उठा लवकर उठा
खोळंबले हे भक्तगण तुमचे
भक्ती - भाव आगळा
आमुचा भक्ति-भाव आगळा ॥उठा ॥

— **सौ. सुनिता सु. सकपाळ,**
सितलादेवी मंदिर कंपौंड,
डॉ. मॅस्कारेन्हास रोड, माझगाव, मु. १०

# प्रार्थना

प्रार्थना ही माझी तुजकडे साईराया
सदा असू द्यावी आम्हावरी कृपाछाया
कधी न झिझवली तुझसाठी काया
उभा जन्म साई माझा, गेला गेला वाया ॥ १ ॥
कधी न घेतले तव नाम मी मुखा
कशासाठी हा देह घालविला फुका?
कधी न घेतले दर्शन तुझे या डोळा
व्यर्थ दवडिले मी सदैव साऱ्या काळा ॥ २ ॥

कधी न ऐकले गोड तुझ्या नामा
वाजवली न टाळी कधी दोन्ही करा
कधी न चालले चरणी तुझ्या राऊळा
घुटमळे मन माझे परि तुझ्या चरणा ।। ३ ।।
कधी न ऐकले, न केली तुझी पूजा
परि मनामध्ये साठविला साईराजा
मुखी नाम येऊ देरे, तुझे साईराया
चंदनापरि झिझो माझी तुझसाठी काया ।। ४ ।।
पुनःपुनः करते तुजला प्रार्थना
नमस्कार करते तुला तुझी लेक भावना ।।

**— सौ. भावना दामोदर जेऊरकर.**
१०, साईधाम, डोंबिवली (प.)

# ये माझ्या हाकेला

रमुनी तू राहू नको शिरडीला।
साई ये माझ्या हाकेला ।।ध्रु ।।
ऐकीली अवाढव्य तव कीर्ति ।
त्यातच गुंग जाहली मती ।।
पुकारी तो तुला मी मदतीसाठी ।
काढीवर मज अता तू बुडत्याला ।।१ ।।
तुझ्या मज झाली दर्शना घाई ।
व्याकूळ जीव किती हा होई! ।।
न होई; बाधा तुला रे साई ।
नियम अंत पहाण्याचा जर मोडीला ।।२ ।।
तुझ्या तू नांव लौकिका करीता ।
तारी मज भवसागरी या आता ।।
राखी त्या ब्रिद गीता-वचना करता ।।
दया अता साद माझ्या हांकेला ।।३ ।।

**— श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी**
१४११/सी लक्ष्मीपूरी कोल्हापूर

# शिरडीचे बाबा परमेश्वर

साई ब्रह्मा साई येशू साई पैगंबर ॥धृ॥

फकीर वेशें भटकत आले। शिरडीमध्यें स्थीर जाहले।
धर्मजातिना मारूनि काठी, असतो म्हणती सर्वांभूती, एकचि तो ईश्वर ॥१॥

कुणी पूजिती ते रामाला। कुणी मानिती ते रहिमाला।
येशू नानक भजति कुणी ते । झरतुष्ट्र वा बुद्धजीना ते
परि ''सबका मालिक एक है'' हें तत्वचि बरोबर ॥२॥

पणति पेटवी पाणि घालुनी। रोग साथिना लावि पळवुनी।
आर्तांच्या ही व्याधि हटविल्या, औषध पथ्याविण।
घडविले कैक चमत्कार ॥३॥

धर्म, जातिचा भेद हरविण्या। उच्च नीच हा भेद हटविण्या।
समता अन् बंधुत्व साधण्या। मानवतेचे रक्षण करण्या।
घेतला फकिरी अवतार ॥४॥

साई हो साक्षात् परमेश्वर । 'बाबा' साक्षात् परमेश्वर
शिरडीचे साई परमेश्वर

— **श्री. द्वारकानाथ साबाजी प्रभू दाभोलकर**
५१/६ साईनाथ सोसायटी, सांताक्रूझ.

●

# स्वामी..गुलाब..गजानन..साई

स्वामी.. गुलाब...गजानन साई
ह्या महाराष्ट्रात जन्मले
त्यांनी भक्तांना उद्धरिले गं...
शेजारीण सखे बाई ॥१॥
साईच्या भजनामधी
जे धावून येती आधी
ते लई आनंदित होती गं....
शेजारीण सखे बाई ॥२॥

साई पावतो लवकर
कामे होतात भरभर
सांगणं आहे हे, खरं गं...
शेजारीण सखे बाई ॥३॥
सुख साईचं देतोय जीवा
भावभक्तीने भजतो तवा
देव दुसरा कशाला हवा गं...
शेजारीण सखे बाई ॥४॥
ह्या साईबाबानं दिला
एक भक्तीमार्ग भला
मंत्र श्रद्धा सबुरीचा तुला गं...
शेजारीण सखे बाई ॥५॥

**— श्री. रमेश डी. चव्हाण**
साईनिकेतन गुजरलेन, नवापूर
जि. धुळे पिनः ४२५४१८

# साई धावा

ओ भगवंता साईनाथा
किती विनवू मी आता
धाऊनी ये तूं मजकरितां
माझ्या पंढरी नाथा ॥१॥
सर्व असूनी दुबळी झाले
दर्शनाची वाट पाहुनी
जीव कंठाशी आले
पंचवीस आक्टोबरची वाट पहात राहिलें
दरवर्षी आम्ही त्याच दिवशीं
तुझ्या दर्शनी येती
परंतु आतां पूर्वीसारखे अभिषेक न होती
हीच मनाला खंत लागुनी रहाती
ओ गुरूनाथा दीना नाथा
दर्शन देरे स्वप्नी आतां
वाट पाहुनी रहातें

**— सौ. सुधा न. गानला**
डॉ. आकुलावाडी
१०, लक्ष्मीनारायण लेन, माटुंगा १

# श्री साईचरणी

जाते मी माघारी, जाते मी माघारी
जाते मी माघारी, श्री "साईनाथा"
तुझे दर्शन झाले आता ॥धृ. ॥

तुझ्या नादाने मी पाहिली
ती तुझीच रे "शिरडी"
धन्य झालो आम्ही जन्माचेऽऽऽ

नाम घेऊ तुझे आवडीने रात्रंदिन ॥१ ॥
दिपावली सदा तुझी रे "शिरडी"
चालू आम्ही भक्ताची वारीऽऽऽ

भक्त म्हणे भक्ती करा "साईची"
जाती पापे पळोनी "जन्माची"

—आशा विठ्ठल सरफरे
न्यू प्रभादेवी रोड,
नागुसयाजीची वाडी
मुंबई :- ४०० ०२५.

# आरती

जयदेव जयदेव जय साईनाथा, सद्‌गुरु नाथा।
आरती ओवाळु गाऊनि तव गाथा...जय...
दावीले चमत्कार भक्तासी नाथा।
ज्ञानामृत पाजीले आपल्या हाता।
दुःखे सकळ हरूनि जाती तुज पहाता।
साई चर्णी ध्यान राहील आता। जय...
शिर्डीस येऊनि निर्मिले क्षेत्र।
तुज सम संत नाही कोणी इतरत्र।
जगी सारिखा मानुनि शत्रु वा मित्र।
निष दिन गाऊ साई तुझेच स्तोत्र। जय...
श्रद्धा सबूरी मंत्र दिधला।

मुमुक्षुसी भक्ती मार्ग दावीला।
भक्ताच्या हाकेशी धाऊनि गेला।
रोग मुक्त करी संत आमळा जय...

नित्य नेमे भक्त येती शिर्डीत।
प्रसन्न होती पाहुनि साई ध्यान:स्थ।
भूपाळी ऐकती सारे एक चित्त।
भक्तिरस प्राशुनि होतात तृप्त।जय...

— **श्री. मधुसूदन अंबाडे,**
अंबाडे हाऊस, लकडी पूल
बडोदा

# जाऊ चला हो शिरडीला

[चाल :- काळ्या मातीत मातीत.....]

जाऊ चला हो शिरडीला ।
माझ्या साईच्या दर्शना ।
माझ्या विठूच्या दर्शना ।
साई कृष्णाच्या दर्शना ॥धृ॥

साईबाबा हो शिरडीत ।
द्वारकामाईत बसत ।
साऱ्या भक्तांना भेटत ।
उदी मस्तकी लावीत ॥१॥

कांही करा या दुनियेत ।
बाबा साई ते जाणत ।
आल्या गेल्याना सांगत ।
तुम्हा पाशीच भगवंत ॥२॥

साई राही हो हृदयात ।
सर्वांघरी तो नांदत ।
सोऽहं स्वरात चालत ।
पूजु त्या साईला मनात ॥३॥

— **श्री. विलास तुकाराम पडवळ**
१७३/४, शिवनेरी
दादासाहेब फाळके मार्ग
दादर, मुंबई ४००० ०१४

# अहर्निश, गोड साईनाथा

ओम् साईनाथा, प्रभु साईनाथा
अहर्निश गाते तुझी गोड गाथा ॥धृ.॥
कृपा सागरा, पतित पावना
किर्ती तुझी ही जगात अवघ्या
मम मानसी तूच विराजला
ओम् साईनाथा, प्रभु साईनाथा ॥१॥
ध्यास लागला मम जिवाला
क्षण एकही चैन पडेना
अंतर्यामी घोष चालला
ओम् साईनाथा, प्रभु साईनाथा ॥२॥
समाधि मंदिरी अभिषेक केला
डोळे भरुनि सोहळा पाहिला
परतून येता कंठ दाटला
ओम् साईनाथा, प्रभु साईनाथा ॥३॥
फोडित टाहो मन साईनाथा
"मधु चातकाचा" ऐकरे धावा
वर्ष, वर्ष दयाधना, साईनाथा
ओम् साईनाथा, प्रभु साईनाथा ॥४॥

**— सौ. मधु यां. गायकवाड**
नवा पनवेल

●

# मागणे

नयनापुढती सतत राहू दे तव मूर्तीचे ध्यान
बाबा दे मज इतुके दान ॥धृ॥
जीवन नौका असे वादळी
घेई सुकाणू तूं सांभाळी
भरकटेल ती दूर कुठेही गळले मम अवसान
बाबा दे मज इतुके दान
दीप स्तंभ तूं उभा सागरी
प्रकाश दिसतो जरी खडकावरी
क्षणांत वादळ बुडवील नौका देई मला जीवदान
बाबा दे मज इतुके दान

संसाराच्या अनेक नौका
वादळ पाऊस जरी असे का
तुझी कृपा त्या तारील अवघ्या भक्तीचे महिमान
बाब दे मज इतुके दान
संथ चालता जीवन नौका
स्मरण असावे तुझे भाविका
तुझ्या कृपेविण भक्ती न उपजे तूझे वरदान
बाबा दे मज इतुके दान
हेच मागणे बाबा साई
तूझ्या चिंतनावाचुन काही
नको मनाला भुरळ कशाची जधी घडे अवसान
बाब दे मज इतुके दान

**— श्री. वसंत वामन प्रधान**
श्री. गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग,
सोसायटी लि. बि. नं. २. ब्लॉक नं ९२
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व) मुंबई ४०००.०८१

# "साईचा धावा"

किती हाकमारू साई। कंठ माझा दाटला।
किती करू धावा तुझा। तु नाही भेटला ॥ धृ ॥
तुझ्या नामाची। आहे मला गोडी।
किती हाक मारू साई। तुला घडीघडी।
कुठे कुठे शोधु। सांग साई तुजला ॥ १ ॥ किती
आता तरी साई माझा। दावा मला कोणी।
आनंदाने अश्रु वाहे। माझ्या या लोचनी।
त्याने जीव माझा। वेडापीसा झाला ॥ २ ॥ किती
कासवा दृष्टी। असे प्रेम पान्हा।
तसा साई पाहे। साऱ्या भक्ताना।
अजब खेळ तुझा। अजब सारी लीला ॥ ३ ॥ किती
दतु म्हणे साई। अमृताचा प्याला।
ज्याला मिळतो। भाग्यवान झाला।
जल्म मरणाचा। फेरा हा चुकला ॥ ४ ॥ किती

**— शाहीर श्री. दत्तात्रय महादेव मोरे**
४७०, शिवाजी नगर, पुणे ५

# साई माझी माऊली

साई माझी माऊली
साई आहे साऊली
संकट समयी धाव घेई
रक्षितसे हो दोन्ही करानी ॥१

धुनि पेटवुनि षड्रिपुंची
मत-मनांची घाण जाळुनि
मशिदी प्रगटली ही
कृष्ण तेज माऊली ॥२

दासगणूनी वर्णिलेली
थोर कृपा गोदातटीची
पाप नाशुनि भक्ता तारी
सदैव धरी दया साऊली ॥३

— श्री. प्रभाकर कोळमकर
गुंफादर्शन, कस्तूरबा मार्ग,
बोरीवली (पूर्व)

# माझा दिवाळी दसरा

दयावंता कृपावंता ज्ञानवंता यशवंता
अंधारात शोधिते मी तुला साईनाथा ॥

निश्चयाचा दिवा, सबुरीची वात
श्रद्धेच्या तुपामध्ये, आशेची ज्योत
जाऊं दे अंधार भरुं दे तेज-किरण
नाहीं सोडणार मी कधीही तव चरण ॥

लागतील तव चरण माझिया घरा
दिवाळी दसरा हाच सण माझा खरा
श्रद्धा आणि सबुरी हा मंत्र तुझा
घुमतो मम कानी, सतत साईदेवा ॥

करिते मी भक्ती कायावाचा मनी
ये धांऊनी त्वरी होईन मी ऋणी ॥

— सौ. अनिता अ. कोरडे
१८, काकडवाडी ४ था मजला,
गिरगांव, मुंबई :- ४०० ००४.

# गोड तुन्ह नाम

गोड तुन्ह रुप। गोड तुन्ह नाम
गोड तुन्ह धाम। साईनाथ ।
भक्ति मया फुले। श्रद्धा सबुरीले
वचनमा तोले। साईनाथ ।
हाऊ सद्‌गुरू। हाऊ कल्पतरु
संकट निवारु। साईनाथ ।
तुज मन्हा बाप। तुज मन्ही माय
दुधने से साय। साईनाथ ।
तुज मन्हा मेऊ। तुज मन्हा तारू
नको दूर करू। साईनाथ।
गये गंध माया। कपायले टिया
हातमान झोया। साईनाथ ।।
लीला म्हने आते। बनु तुन्हा दारे
किरपा ते करे। साईनाथ ॥
गोड नाम लेवू। गोड रुप जोवू
आनंनमा न्हावू। मायबाप।

**टिप**:-तुन्ह = तुझ. भक्तिमया = भक्तिमळा. हाऊ = हा. मन्हा = माझा. गये =गळा. गंधमाया = गंधमाळा. हातमान = हातामध्ये. झोया = झोळ्या. कपायले टिया = कपाळाला टिळा. बनू = आलो. किरपा = कृपा. जोवू = पाहू. आनंनमा = आनंदात.

— सौ. लीला मराठे,
राठी बंगला, साक्री रोड, मु. पो. धुळे

# मनाचे वैद्य—साई

साबणाने निर्मळती
धुळींचे वस्त्र ते
कायेवरील जखम
निवारी औषधे ॥१॥

पैक्यांनी साधती
इच्छा तव मनींच्या
अन्न न पुरति परी
मन स्वच्छ ठेविण्यां ॥२॥

मनीचा मळ धुण्यां
सुलभ उपाय सांगतो
नको एक दिमडी की
हाल कष्ट ही नकोत ॥३॥

श्रद्धेने अंतरी
नाम जप होऊनी
काया वाचा मनाने ॥४॥

विनम्र-भावे भक्तिने
प्रार्थिता बाबांशी
विकल्प लहरी मनीच्या
विरघळूनी पार जाती ॥५॥

**—श्री. प्रदिप शं. पिरणकर**
विर्नोडा पेडणे-गोवा
४०३५१४

# उघडले साई मंदीर द्वार

(चाल- दाटला चोहीकडे अंधार)

उघडले साई मंदीर द्वार
भरला बाबांचा दरबार -धृ.-
भक्त वृंद हे येथे जमले
आनंदाने गावूं लागले
टाळ वीणेचे निनाद उठले
साईलीला अपरंपार- भरला बाबांचा दरबार -१ -

सुस्वर गायन स्वर सनयीचे
तसेच मंजूळ स्वर मुरलीचे
ऐकून उठले साई जागचे
करण्यां भक्तांचा उद्धार-भरला बाबांचा दरबार -२

प्रेमासाठी देव भुकेला
साई नटेश्वर नाचू लागला
भक्तां संगे खेळू लागला
साई भक्तांचा आधार-भरला बाबांचा दरबार -३

गेले जरी साई शरीर सोडून
आर्त हाकेला येती धावून
सत्य सत्य हे साई वचन
वन्दन हें त्रिवार - भरला बाबांचा दरबार -४
उघडले साई मंदीर द्वार भरला बाबांचा दरबार

**— श्री. डी.बी. पोतनीस**
पिम्परी पुणे

# साईरुप व्हावे

मी पामराने किती गुण गावे
वाटते मनी मी साईरुप व्हावे
अमंगल माझ्या मनीचे सदा दूर व्हावे
साईगुण गाता गाता मी साईरुप व्हावे ।। १ ।।
साईनामा मध्ये असे दिव्य तेज
साईनामा मध्ये असे अलौकिक साज
साईनामा मध्ये असे भव्य प्रचिती
साई प्रचिती घेऊनी मी साईरुप व्हावे ।। २ ।।
साईनाथ करीती किमया अगाध
साईराम करीती कृपा अथांग
साईनाम घेता टळते दुःख दैन्य पार
म्हणूनी सदैव वाटे साईरुप व्हावे ।। ३ ।।
शिर्डीस ज्यांचे लागतात पाय
जीवनांत त्यांच्या राही कमी काय
टळतात त्यांचे सर्व अपाय
म्हणूनी मज वाटे साईरुप व्हावे ।। ४ ।।
साईसाई म्हणूनी सदा साद घाली
साईराम मजला दर्शन देती
हाकेसरशी माझ्या येती धावूनी
साईनाम घेऊनी मी साई रुप व्हावे ।। ५ ।।

— **श्री. मधु पाटणकर**
३४/९०३ नेहरु नगर
कुर्ला, मुंबई २४



# बाबांची मंदीरे

बाबा,
सूर्यापासून ते पृथ्वीपावेतो
विश्वात जे जे आहे
ते सारे
अंशरूप आहे
अशी आमची श्रद्धा
म्हणून त्यांची आम्ही
देवळे बनवली
त्यांना नवस केले
जे नवसाला पावले
त्यांचा जाज्वल्य म्हणून
बोलबाला केला
त्यांच्या नावावर
काही पिढ्या जगतात
काही तर आपणही
देव बनू बघतात
बाबा,
कोणत्या देवाची मंदीरे
आम्ही बांधली नाहीत?
कोणत्या देवाला आम्ही
देव मानले नाही?
आमच्याने जिर्णोद्धार होणार नाही
इतकी मंदीरे असतांना
बाबा,
आपली मंदीरे आम्ही
का उभारतो ?

— **श्री. ग.दे. कुलकर्णी**
नारायण नगर,
अमरावती-४४४६०६

# तू माझा परमेश्वर

कटाक्ष टाकुनि पावन केले मजला साईश्वरा।
कुण्या जन्मिचे पुण्य चालुनी आले माझ्या घरा॥
हळूच क्षणभर चमक दाविली सस्मित वदनावर।
स्निग्ध मधुर नव भाव रोखिले हळल्या ओठावर॥
डोइस फडके अंगी कफनी आसन दगडावर।
मुक्या मुखातूनि वाग्दानांचे तुटले मौलिक सर॥
दर्शनास मी आलो तेव्हा दृष्टभेट लाभली।
जन्मातरिचे सौर्हद अपुले गाठ अतुट जाहली॥
हृदय गातसे उचंबळूनी मंगल गुण गायन।
स्वर्ग संपदा हाती आली गेलो आनंदून॥
भक्तिलतेची पहिली सुमने तुजसाठी गुंफिली।
तुझिया चरणी अर्पण करण्या आलो धावूनी॥
श्रद्धा सबुरी बोल ठसविले तुवांच हृदयी हे।
तुझीच मूर्ती हृदयी ठसली नित्य तिची दर्शने॥
साकाराचा निराकार तू सगुणाचा निर्गुण।
तू माझा परमेश्वर तुजला कोटी कोटी वंदन॥

**— श्री भास्कर गो. जोशी**
साई प्रसाद, ४२ श्रीकृष्ण नगर,
बोरीवली (पूर्व) मुं-६६

# साई नमस्कार

असो तुला साई माझा सदा नमस्कार
तुझ्या दया दातृत्वाला अंत नसे पार॥धृ॥
तुझ्या कृपेने रे होतील, फुलें फत्तराची।
तुझ्या कृपेने रे होतील, मोती मृत्तीकेची॥
तुझ्या कृपेने रे होईल, सर्प रम्य हार॥१॥
तुझ्या कृपेने रे होईल, सुधा त्या विषाची।
तुझ्या कृपेने रे होईल, उषा त्या निशाची॥२॥
तुझ्या कृपा सिंधु मधला, बिंदू जरी मिळेल।
तरी प्रभो शतजन्माची, मम तृषा शमेल॥
तुझी म्हणोनी आले बाबा बघत बघत द्वार॥३॥

**— सौ. सिंधू कृष्णराव सणस**
साईनगर करोल जि. नागपूर

# असो साई! तव ध्यास निरंतर!

असो साई! तव ध्यास निरंतर ।
तुजविण नावडो अन्य अवांतर ।। धृ० ।।
हीन दीन मम पतित-जीवन ।
नाम साई! तव पतित-पावन ।।
परिस्थितीचा मी किंकर परि, अधिन तुझ्या मम स्थित्यंतर ।। १ ।।
शैशवांत मम नव्हते ध्यान ।
यौवनात प्रभू! नुरले भान ।।
संभ्रमात मी सापडलो रे, मदनाचे हे मध्यंतर ।। २ ।।
जडल्या संवयी अशा घातकी ।
मन हे माझे महापातकी ।।
करू नये ते करवीत आधी, कर्तव्याते करवीत नंतर ।। ३ ।।
चिंतनार्थ तव मिटतां लोचन ।
मन हे चिंति ते कांता-कांचन
अवघे चराचर अंकित असतां, कां मग मन मम अधांतर ।। ४ ।।
कींव न कां मम येईल किंचित ।
कुठवर व्हावें प्रतिपद ॥ वंचित ॥
कुठंवर साहूं सांग यातना, कुठवर नागेशा जन्मांतर ।। ५ ।।

— श्री नागेश मोगलाईकर,
"नागलक्ष्मी", २८२०, ग.नं. ४, धुळे ४२४००१

●

# शिरडीस जाऊ

शिरडीस जाऊ साईनाथ पाहू ।
दिनांचा कैवारी अनार्थांचा नाऽऽथ ।
लिंब वृक्षाखाली बैसली ही स्वारी ।
भजन पूजन करू चला सारी ॥१ ॥
भक्तकाजासाठी तिष्ठतसे साई ।
जाऊ पाहू चला कृपाळू ते साई ।
करूनिया आरती आणिक पूजन ।
घेऊनीया तीर्थ उदीचा प्रसाद ।
हृदयात ठेवू साई कृपावंत ॥२ ॥

— श्री. बी. व्ही. लांजेकर,
श्रीसदगुरु साईनाथ कृपामठ, स्वारगेट (पुणे)

# नव वर्षाचे स्वागत-संदेश

नूतन वर्ष हे डौलत आले
आनंदाने झगमगले।
साईलीला अवतरले हो
धन्य झाली आता अवनी हो।। १।।

साईची कृपा होई जेथे
दुःख विमोचन आहे तेथे।
साई कृपेची अखंड ज्योत
हृदयीच अमुच्या मिणमिणते।। २।।

कलियुगी ह्या जगा तारण्या
अवतरले भूतली साईनाथ।
सर्वधर्म सम भाव मांडिले
बंधुत्वाचे नाते जोडिले।। ३।।

शिरडी नगरी पावन केले
श्रद्धा सबूरीचे निर्माल्य फेकीले
दोन्ही कराने आम्ही ते झेलीले।। ४।।

नूतन वर्षाचे करू या स्वागत
मोठ्या आनंदात
गाऊनी लीला श्री साईंची
दिव्यत्वाची आज प्रचिती।। ५।।

— श्री.विजय सहामते
'साई निवास' मु. पो. चिंचणी
ता. डहाणू, जि. ठाणे

# शिरडीचा तारा मावळला

शिरडीचा तारा मावळला। तारा मावळला।
दुःखाने व्याकूळ झाला। जीव हा ॥ १ ॥
अश्रुनयनी भरूनी हे आले। भरूनी हे आले।
गालावर टपटप पडले। थेंब ते ॥ २ ॥
मातेविना लेकुरे जैसे। लेकुरे जैसे।
साई तुजविण झालो तैसे। आजवरी ॥ ३ ॥
पाण्याविना मासा वळवळतो। मासा वळवळतो।
माझा प्राण तसा तळमळतो। तुझ्याविना ॥ ४ ॥
संकटे सांगू कोणाला। सांगू कोणाला।
कोणी वाली नच हा उरला। तुजसम ॥ ५ ॥
आठवू तुझ्या त्या लीला। तुझ्या त्या लीला।
त्या तुझ्याही संगे गेल्या। साई हो ॥ ६ ॥
जरी देहरूपी मावळला। जरी मावळला।
आत्मरूपी अमर राहिला। जगती या ॥७ ॥
मयूर म्हणे साई नाथा हो। साई नाथा हो।
सदा स्मरण तुझे मनी राहो। माझी या ॥ ८ ॥

**— श्री मोरेश्वर रामकृष्ण खेडेकर**
जीवन आराधना सो.अ./६/१/१२
जीवन बीमा नगर, बोरीवली (प.) ४००१०३.

## डॉ. श्रीमती चारूशिला गुप्ते यांचे निधन

मराठीतील एक ज्येष्ठ लेखिका, नामवंत प्राध्यापिका व साई सेविका प्रा. डॉ. श्रीमती चारूशिलाबाई गुप्ते यांचे शनिवार ता. २८.१२.८५ रोजी झोपेतल्या झोपेतच हृदयक्रिया बंद पडून देहावसान झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. त्या निष्ठावान साईभक्त होत्या. त्यांनी साई विषयक अभंग, पदे, आरत्या, कादंबरी अशी बरीच साहित्यांची निर्मिती केली आहे. त्यांचे पती श्री. बाळकृष्ण गुप्ते हे पण साई बाबांचे भक्त होते. ते गेल्या फेब्रुवारीत निधन पावले होते. श्रीमती गुप्ते यांच्या पश्चात मुलगा चि. प्रणय व सून असून ती परदेशात असतात.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# अभंग श्री साईबाबांचा

(चालः- शिरडीच्या साईनाथा नवसाला पावरे)

शिरडीवाले साईबाबा
कधी भेटतील मजला
एकच ध्यास मनी लागला
साई दर्शन द्या हो मजला ॥१॥ एकच ध्यास

दुःखितांचे लाल तुम्ही
तुम्ही दिनांचे वाली
संकटात आधार तुम्ही
तुम्ही गरीबांचे कैवारी
लागतील काय पाय शिरडीला
साई दर्शन द्या हो मजला ॥२॥ एकच ध्यास

किती वर्णू तुमची लीला
तुमचा चमत्कार धरतीला
दिपवालीचे दिवशी तुम्ही
पेटविले पाणी पणतीला
देवा साई नमस्कार चरणाला
साई दर्शन द्या हो मजला ॥३॥ एकच ध्यास

तु दैवत आमुचे
तु दयेचा सागर
तुझ्या दर्शने होतसे
पतितांचा उद्धार
म्हणूनी साई करतो धावा
मजला न्या हो शिरडीला
साई दर्शन द्या हो मजला ॥४॥ एकच ध्यास

— सौ. निला अनिल रसाळ
गणेश कृपा, बैलबाग, रत्नागिरी.

# श्री साई स्तवन

परमपावना साईरामा, भक्ती सुमनांचीं।
पहा आणिली तुझ्या, स्वागतास्तव माला नामी।
धैर्याच्या दोऱ्यात गुंफिली, श्रद्धांची सुमनें।
नामाचा हा सुगंध भरला, एकतत्व निष्ठेने।
प्रेमभक्तीचे विविध रंग हे, भाव अंतरात।
घेऊनि आले भावे माला, तुझ्या मंदीरात।
गळा घालिते साई माऊली, आशीष मज द्यावा।
असे मी आश्रित नाथा तुमची, लोभ असू द्यावा।
आत्मा साई सदैव माझा, देह पंचतत्वांचा।
सत्तेचे तू स्फूरण साई, तूच असे कर्ता।
तुझे शब्द हे, तुझी प्रेरणा, तुझेचि स्तवन।
करूनि घ्यावे गोड गीत हे, घे मज सांभाळून।

— सौ. शांता अंबाजी सरोदे
उल्लेंगल बि. नं. ६ खो. नं. १०
एन.सी. केळकर रोड, दादर मुंबई २८

# द्वारकामाईतील शीला

सिंहासनी ती शिला योजिली बसण्या बाबांनी
हेतू, होता गुप्त तयांचा नये सहज कळूनी
दगडावरती पडता पाणी दगडही तो झिजतो
संस्काराचा असा ठसा हा सहज दिसून येतो ॥१॥
ईश्वर सेवा घडता घडता, ठसा शरीरी उठतो
इशरुपतो होऊनी मानव जगाशी उद्धरीतो
दगडही झाला देवरुप तो बाबा संगतीने
पतीता करीतो पावन आता ईश्वर शक्तिने ॥२॥
बाबा गेले सोडूनी देहा, दगडा ठेवूनी
शिला माई ती भक्ता बघते प्रेमे जवळूनी
दिव्य तिचा तो स्पर्शही भक्ता आनंदा देतो
रुपया लावूनी प्रसाद घेता, लक्ष्मी स्थीर करीतो ॥३॥

— श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ-निवास, चेंबूर गांवठण, मुंबई-४०००७१

# कलीयुगी अवतार - साईप्रमाण ।

[चाल :- बाकडबम बम. चित्रपट : कठपुतली]

साईराम-साईराम करूनी ध्यानं...२
सुखावतो मनो-मनी भक्त हा राम.. ॥घृ. ॥

शंकराची पिंडी दिसे साईच्या ठायी ।
विष्णूचक्र फिरतसे श्रद्धा सबुरी ॥
भक्तांना हे असे; साई ईश्वरा समान ।
सदा संकटी रक्षी उदी संजीवन ॥
माझे साई, माझे साई म्हणे भक्त..., हो म्हणे भक्त जन ।
सुखावतो मनो-मनी भक्त हा राम.. ॥१ ॥

गोदावरी थडी माझा साई विठ्ठल ।
उभा ठाकला जगद्‌कल्याण प्रत ॥
नित्य-नेमे भजती - "साई" श्रद्धापूर्वक ।
इच्छापूर्ती होई त्यांची, जन्मा सार्थक ॥
माझे श्याम-माझे श्याम. म्हणे भक्त जन.., हो म्हणे भक्त ।
सुखावतो मनो-मनी भक्त हा राम ॥२ ॥

कलीयुगी अवतार साई प्रमाण ।
सत्यधर्म रक्षण्या हो झिजविला प्राण ॥
कृष्ण साई, दत्त साई - साई समर्थ ।
द्वारकामाई - शिर्डी अमुची पंच प्राण ॥
साई दाता - साई त्राता म्हणे भक्त जन.., हो म्हणे भक्त जन ।
सुखावतो मनो - मनी भक्त हा राम... ॥३ ॥

**— श्री. राम धनावडे**
सुखशांती को.ऑ. हौ. सोसायटी
कन्नमवार नगर, विक्रोळी (पू)
मुंबई - ४०० ०८३

# साई होवूनी लीला गावे ॥

साईऽऽनाथा, साईनाथाऽऽ
शरण जावें,
साई होवूनी लीला गावे ॥धृ. ॥
साई ऐसे तत्व षड्विकार :
काम क्रोध मद् मत्सर,
दंभ अहंकार ते त्यागावे ॥१॥साई होवूनी.
रज तम सत्व ही त्रिकूटी ।
शोभे त्रिमूर्ती दत्तात्रय ।
दत्तात्रय सूत सूरेश सांगे साईशी भजावें ॥२॥ साई होवूनी

— **श्री सुरेश दत्तात्रय आजगांवकर**
४५ गंगाबाई मॅन्शन, गोविंद केणी रोड,
भोईवाडा, परळ - १२

---

# बाबांचा हिंदु मुस्लीम भक्तांना उपदेश

हिंदु मुस्लीम सारे आपण धरतीची पाखरें
नांदू गुण्यागोविंदे येथे, अेका अल्लाची लेकरें
उच नीच भेद न येथे, सर्व असती समान
म्हणून भक्तहो तुम्हां सांगतो रहा आनदानं.
अेकच अग्नि अन्न शिजवितो सर्व धर्मांचे
अेकच नभा खाली वसती जन सर्व जातीचे
अिश्वर म्हणून पुजा करिती हिंदु मंदिरात
तोच अिश्वर अल्ला म्हणुनी नमिती मशिदीत.
अेकच जीवन तृषा शमविते हिंदु यवनांची
भूक भागविते अेकच अन्न सर्व मानवांची
जान म्हणता तुम्ही ज्याला तोच हिंदूचा प्राण
मुस्लीम देव ताबुत पुजिती किती हिंदू जन
सांग नूर तूच आता काय फरक दो जातीत
उगाच झगडे काढून लढता अेकमेकांत
मानवता हा धर्म शिकविला प्रत्येक सन्ताने
म्हणूनच म्हणतो नांदा येथे सुखसमाधानाने

— **श्री. कृ.भा. देशमुख** ३८३ शुक्रवार पेठ, पुणे - २

# जेथे तुझे चरण

बाबा गुलाबबाबा धावे मम मन ॥धृ॥
आम्हा ते ब्रम्ह नाही ठावे-समाधीसुख नाही ठावे
एकच ठावे भजन करावे-हरिनामात तल्लीन व्हावे
वेड लावी तुझे हे रुप-बा गुलाबा द्या दर्शन ॥१॥
पाठीवरी असावा मायेचा तुमचा हात
मोहरूनी जावी काया तुमच्या स्नेहल दृष्टीत
भगवंत बाबा तुम्ही-आम्ही आलो शरण ॥२॥

— श्री. बबन डी. थेरम
१/५, कल्याणजी देवजी चाळ-
चिरागनगर घाटकोपर मुंबई-४०००८६

# साई-दर्शन

साईबाबा साईबाबा जय-जयकार जय-जयकार
गळा वैजयंती तुळशीचे हार ॥धृ॥
द्वारकामाई द्वारकामाई मुक्तीचे धाम - मुक्तीचे धाम
संजीवनी विभूतीचे बहुमोल काम
पाहूनीया साई होती संकटे बेजार - संकटे बेजार
गळा वैजयंती तुळशीचे हार ॥१॥
समाधिस्थ असती साई जरी - साई जरी
दृष्टी असे सदा भक्तांवरी
साई वाहती भक्तांचा भार - भक्तांचा भार
गळा वैजयंती तुळशीचे हार ॥२॥
श्रद्धा-सबुरी असता हृदयांतरी - असता हृदयांतरी
संकटे पळती दुरच्या दूरी
समाधी दर्शने जन्माचा उद्धार - जन्माचा उद्धार
गळा वैजयंती तुळशीचे हार ॥३॥साईबाबा

—सौ. लक्ष्मी हरिश्चंद्र कानकेकर
१३/५ नासीरखान मिस्त्री चाळ मेघवाडी
जोगेश्वरी(पूर्व) मुंबई ४०००६०

# साई हा परिसाहून महान...

साई हा परिसाहून महान
परिस करी लोहाचे सोने साई करी स्वसमान...
लक्ष हार हा कधी न मागतो
अंतरिचा हा भाव जाणतो
चैतन्याचे चैतन्य मुळी साई सत्य इमान....
नमस्कार हा एकच घेई
अंतराय हा कुणा न देई
योगक्षेमा सावरताना साई होई लहान...
साईनाथ हा आदीनाथ
स्वामी सखा हा विश्वनाथ
ऐन सुखाचे एकच आहे साई-अमृतगान....

**— श्री. दत्ता कदम**
१३२४ शिवशंकर मगदूम निवास
खारे घाट रस्ता रत्नागिरी ४१५६१२

# सत् श्री साई

मुखी घेता साई नाम ॥
आठवते सारे शिरडी ग्राम ॥
काय वर्णावी निसर्गाची शान ॥
क्षणभर विसरे स्वतःचे भान ॥१॥
मुखी घेता साई नाम ॥
क्षणी होते दुःख निर्वाण ॥
साई देखता लोचनी ॥
मन तृप्ती समाधानी ॥२॥
मुखी घेता साईनाम ॥
रूप आठवे मनोमन ॥
नेत्र हस्त दर्शविते ॥
मनी सबूरी समाधानी ॥३॥

**— सौ. कल्पना गोवेकर**
शमसुद्दीन चाळ, अंधेरी

# श्री साईनाथ प्रसन्न

शिर्डी क्षेत्र हे पावन भुमी ॥
नमिते अत्यंत आदरे मी ॥१॥
जो अनाथांचा सोयरा ॥
धांवे भक्तांच्या कैवारा ॥२॥
साईचे उदीचे चमत्कार ॥
करीती सर्वांच्या व्यथा दूर ॥३॥
साई साई घेता नाम ॥
होई श्रद्धा सबूरीने काम ॥४॥
साई दीन दुबळ्यांचा त्राता।
साई चरणी ठेविते माथा।५।

**— सौ. स्मिता दि. कुळकर्णी**
विष्णु निवास, वांगणी
ता. उल्हासनगर, जि - ठाणे.

# साईबाबा

कुणी म्हणे बाबा, कुणी म्हणे साई
दिसे एकच रूप, जैसा भाव मनी ॥१॥
आर्त पुकारोनी साद घाली साईला
तयांच्या कामना जाती पूर्णत्वाला ॥२॥
साई भेटीची भूक लागेल जेवढी
तृप्त होईल क्षुधा, साईकृपेने तेवढी ॥३॥
प्रेम कराल जेवढे दशदिशांत
तेवढा प्रकाश तेवेल अंतरात ॥४॥
जपता साईनाम होते शुद्ध मन
साई दर्शनाने शूचिर्भूत होते तन ॥५॥
निष्काम भक्ती, तरी मिळे मुक्ती
साईबाबा घेती तया अपुल्या सांगाती ॥६॥

**— श्री. अरविंद बारटक्के**
१३५ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२

# भगवंत साईनाथ

(चाल :- मुझे पिनेका शौक नही)

माझा भगवंत शिरडीसी, आला साईनाथ होवूनी ।
शरण गेलो तया चरणी, संत कृपा व्हावी म्हणूनी ॥ धृ. ॥

दया सिंधु कृपावंत - हा शिरडीवासी संत ।
किती उद्धरीले पतीत - तया नसे कांही अंत ॥
अैसा अनुभव अैकूनि - तैसा आलो मी धावूनी ॥१॥

बुडत्यासी हा तारीतो, दुरीतांसी निवारीतो ।
स्वप्नात कधी बोलतो - अधिकार तिथेही चालतो ॥
भक्त कैवारी हा म्हणूनी - अैके अमुची तो गाऱ्हाणी ॥२॥

कुणी कोठेही प्रार्थीतो - तेंव्हा तेथे उभा राहतो ।
"दास पंढरी" हा म्हणतो - भक्त अनुभव निवेदितो ।।
देव भक्तांची कहाणी - बघा ग्रंथासी वाचूनी ॥३॥

**— श्री. पंढरीनाथ खर्डेकर**
मु. पो. लोही, ता. दारव्हा
जि. यवतमाळ (विदर्भ)

# साईवंदन

साईपूजेच्या या शुभसमयी
नमुनि साईला पुण्य घेऊ या ॥धृ. ॥

साईनाथांची गाऊ गाणी
मनी राहिली मुर्ती अजुनी
चला चला रे सर्व मिळुनी
नमुनि साईला पुण्य घेऊ या ॥१॥

अशीच राहो कृपा-दृष्टी तव
घेऊ आपण अगणित अनुभव
श्रद्धा-सबुरी वचने घेऊनी या
नमुनि साईला पुण्य घेऊ या ॥२॥

**—कु. सुधा जगन्नाथ परूळेकर**
दातार कॉलनी भांडूप पूर्व मु.नं. ७८

# साई — साई

साई-साई
नाम भजतो
साई भक्त
शिर्डी जातो ॥१॥

साई-साई
भजन करीतो
साई भक्त
दंगुनी जातो ॥२॥

साई-साई
पूजा करीतो
साई भक्त
तल्लीन होतो ॥३॥

साई साई
आरति करीतो
साई भक्त
गुणगान करीतो ॥४॥

साई साई
ध्वज मिरवितो
साई भक्त
महिमा गातो ॥५॥

साई साई
मंदिरी येतो
श्रीमुख पाहूनी
धन्य होतो ॥६॥

— **श्री. ग. शां. बडगुजर**
मोगलाई, भाटे चाळ,
धुळे ४२४००१

# साईनाथ बाबा

दीन-दुबळ्यांचा
तूच साई वाली
कृपा तुझी झाली
आम्हावरी ॥१॥

दर्शनाने तुझ्या
झालो बा पावन
आता मुखी नाम
तुझे असे ॥२॥

तुजविन आता
नाही करमत
सदा कार्यरत
तुझ्या ठायी ॥३॥

साईनाथ देवा
अशी करा कृपा
पुन्हा पुन्हा खेपा
नकोत या ॥४॥

— **श्री मुकेश म. कामत.**
कामत निवास (वाडगांवफाटा)
ता. अलिबाग - रायगड

# अभंग-साई लीलेचा

साई माझी माता। साई माझा पिता
असे सौख्य दाता,। साई माझा ॥धृ॥
साई माझा। सगुण साकार
दयेचा सागर। साई माझा ॥
साई माझा सखा। होई पाठीराखा
असे बुद्धी दाता। साई माझा ॥
भावीक म्हणे आता। तुम्ही माझी कामना
सुख हे नेत्रा, दर्शनी तुझा
साई माझी माता। साई माझा पिता

**श्री. विलास श्रीधर कुळकर्णी**
१६अ/४ मीठानगर म्यु. कॉलनी
महात्मा गांधी रोड
गोरेगांव (प) मुंबई : ४०० ०९०

# प्रार्थना

सकलांना हो सकलांमध्ये निज आत्म्यांचे ध्यान ।
सकलांना हो सकलांमध्यें परमात्म्याचें ज्ञान ॥
सकल हि देखो सदा सर्वदा सकलांचे सुख हित ।
सकलांमध्यें सदा सर्वदा वाढो निश्चित प्रीत ॥ १ ॥
परस्परांच्या लाभासाठी लोपो सर्वांचा स्वार्थ ।
परस्परांच्या हितार्थ होवो प्रगाढ परमार्थ ॥
सोडूनी 'स्व' च्या सिमीत सीमा साधो सहज सुख ।
परस्परावरी वाढुनी श्रद्धा वाटो विश्वास ॥ २ ॥
विसरूनी वैरा परस्परांच्या वाढो सद्‌भाव ।
आधिव्याधी नष्ट होऊनी हो सुखशांती पर्व ॥
परम दयामय साई होवो मान्य हीच प्रार्थना ।
तव चरणांचा आश्रय लाभो हीच मनी कामना ॥ ३ ॥

**— श्री. रा.ग. गुप्ते**
३५/B-मनीष नगर अंधेरी (पश्चिम)

# श्री साईनाथ प्रसन्न

चला या जाऊ शिर्डीला। नमू त्या साईसदगुरूला ॥धृ॥

जगाच्या कल्याणासाठी। प्रगटला साई जगजेठी ॥१॥(चलाया)

शरण त्या साईशी जाता। अभय तो देई भयभीता ॥२॥(चलाया)

अळवीता नाम साई साई। संकटी धांव तो घेई ॥३॥(चलाया)

# श्रीसाईनाथ मानस पूजा

कृपाळू साईनाथ देवा।
स्वीकारा भक्तीभाव ही सेवा ।धृ।

त्यागाचे ते चंदन उगळूनी।
वैराग्याचे केशर मिसळूनी।
तिलक असा मी तुला लाविला ॥१॥

भावमनींची सुमने घेऊनी।
पावित्र्याची तुळस ओवूनी।
हार असा मी तुला घातला ॥२॥

मायामोहची विस्तव करूनी।
कामक्रोध हे त्यात जाळूनी।
धूप असा मी तुला दाविला ॥३॥

ज्ञानाचा हा दीप उजळूनी।
प्रेमस्नेह हे त्यात घालुनी।
दीप असा मी तुला लाविला ॥४॥

सद्भक्तीचे नवनीत घेऊनी।
श्रद्धासाखर त्यात घालुनी।
नैवेद्य असा मी तुला अर्पिला ॥५॥

**— कु. शकुंतला भोसले**
७/१५, आंबेकर नगर, परेल टँक रोड, मुंबई.

# धाव घ्या हो साईबाबा

धाव घ्या हो साईबाबा। धाव घ्या हो साईबाबा
हजारो संकटे येती दारी
त्या संकटातून आम्हा तारी
तुम्हाविन दुसरा नसे हो कोणी
धाव घ्या हो साईबाबा। धाव घ्या हो साईबाबा ॥१॥
तुम्हा पाहता मन आनंदे
वडीलारूपी तुम्ही दिसतसे
दर्शन द्या साई मज-दर्शन द्या साई
धाव घ्या हो साईबाबा। धाव घ्या हो साईबाबा ॥२॥
तुमच्या उदीचा महिमा हो असे
दुःखीताना आनंद देतसे
वैभव शिखरी आम्हा नेतसे
परंतु आता नसे हो कोणी तुम्हा विन साईबाबा
धाव घ्या हो साईबाबा। धाव घ्या हो साईबाबा॥३॥

**— सौ. सुशिला सयाजीराव साळुंखे**
२३२, गुरूवार पेठ, सातारा

# मुक्तीचा आनंद

श्वास साईनाथ उच्छवास साईनाथ
रोम रोम साईच्या दंग चिंतनात ।
भक्ती सुमनांचा झेला
शुद्ध मने वाही तुला
लाख लाख साष्टांगे तुला प्रणिपात ।
साई विना नाही मुक्ती
साई हीच सर्व शक्ती
साईचा हात दावी अंधारात वाट ।
तोडूनिया भव बंध
साई भजनात धुंद
तुज मुळे मज मिळो मुक्तीचा आनंद ।

**— श्री. धोंडू पेडणेकर**
केळवे (पालघर)

# पाठीराखा साई

धन्य झालो मी मनी,
तुझे गीत लिहिता साई ॥१॥
साई साई माझ्या नाम्या,
संकट समयी मार्ग दाव आता ॥२॥
धन दौलताची नाही अपेक्षा,
तुच माझा पाठीराखा ॥३॥
वंदितो तुझ्या स्मृतीला,
पाव माझ्या भक्तीला ॥४॥
नतमस्तक हे तुझ्या चरणी,
या बाबा, बसा माझ्या हृदयमंदीरी ॥५॥

**— श्री. विजय कदम**
इनकमटॅक्स कॉलनी, भांडूप मु. ७८

# शिरडीला जाऊ

चला सारे शिरडीला जाऊ
डोळे भरूनी साईला पाहूं
साई भक्ती करिता अपार
संकटे जातील पळूनी दूर
नाथांची गीते आपण गाऊ ॥१॥
मिळते तेथे प्रसाद विभूती
आरोग्य सुखाची होईल प्राप्ती
जीवनांत आनंद मिळवूं ॥२॥
चला नाथांची शिरडी आली
साई भेटीची ओढ लागली
संत चरणी मस्तक ठेऊ
डोळे भरूनी साईला पाहूं ॥३॥

**— सौ. आशालता कालिदास भालेराव**
दत्तमंदिर वाडा. मू.पो.ता. नवापूर,
ता. नवापूर जि. धुळे

# शिरडीचा मी वारकरी हाय

साईबाबांच्या भजनी रंगायचं हाय ॥धृ.॥
शेगांवात गजानन महाराज
अक्कलकोटी अक्कलकोटराज
श्री साईनाथ शिरडीत हाय ॥१॥ साईबाबांच्या.
साईबाबांना भक्त लई प्यारा
संकटी देतो भक्ताला निवारा
ऐसा साईचा महिमा हाय ॥२॥ साईबाबांच्या.
साऱ्या शिरडीत फिरलो ग बाई
भक्त वदनी उच्चारी साई साई
साईचा गजर गर्जत ऱ्हाय ॥३॥ साईबाबांच्या.

— श्री. विनायक पर्शराम ताठरे
मु. पो. वांद्री, ता. संगमेश्वर,
जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)

# तूच खरा आधार

(चाल :- तू माझा यजमान)

तूच खरा आधार, कृष्णा ॥धृ.॥
पांचाली सभेमाजी स्मरता ।
पुरविसी वस्त्र अपार ॥१॥
अंध अपंगा काठी देऊनी ।
चालवी मार्ग अपार ॥२॥
बालफुलांसी जवळी घेऊनी ।
खुलविसी तू हळूवार ॥३॥
कला आईला पुढे घालूनी ।
गोविले भजनी बेजार ॥४॥
मूढ चैतन्या ज्ञान देऊनी ।
चुकविसी का भवपार? ॥५॥

— श्री. चंद्रकांत सखाराम लोगडे
५३/५५ मुगभाट लेन,
खंबाटा चाळ, खो.नं. ६
मुंबई नं. ४०० ००४

# वर्षू दे साईकृपा घन

जलधारांपरी वर्षू दे,
वर्षू दे साईकृपा घन
भिजून जावू दे ओलेचिंब
अवघे माझे मन ॥धृ॥

साईवीन कांही न सुचू दे
साईवीन वेगळा क्षण न राहू दे
आठवू दे मज आठवू दे मज
साईचे रूप महान ॥१॥

साईमय झाले अवघे जगत
साईवीन नकोत आणखी देव भगत
गावू दे गावू दे मज
साईचे गोड गुणगान ॥२॥

साई साई करू दे आता घाई
आयुष्याची घडी सरते लवलाही
विसरु दे विसरु दे मज
साऱ्या जगताचे भान ॥३॥

साईरुप होवू दे मजला
हृदय मंदिरी साई देव वसला
आता न मजला फिकीर कशाची
नाही कसली वाण ॥४॥

**–सौ. नीता उल्हास जाधव**
६२९, सरेकर आळी
महाड, रायगड.

# साई दत्तगुरु

साई दत्तगुरु साई कल्पतरू
आदी माया ब्रम्ह गणेशावतारू..
साई विद्यादाता साई सरस्वती
रिद्धीसिद्धी साई साई धनपती
जीवन सागरी साई होय तारू...
रामकृष्ण तोची नित्य-साई-साई
परब्रम्हतेची विठू रखुमाई
रंजल्या गांजल्या साईकृपाकरू...
साई आदी अंत साई भगवंत
चराचर व्यापी तोचि कृपावंत
अुजाड जीवनी साई दे निवारू..
श्रुति स्मृति साई साई वेद मंत्र
जीवन प्रकाश साई शशि मित्र
अुजळीत जाई प्रकाश अंधारू...

**–श्री मधुकर कृष्णाजी विचारे,**
१५-बी, भक्ति-सुधा, वाकोला पाईप लाईन,
दत्त मंदीर रोड, सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई ४००० ०५५

# साई नामे तारिले

आज पाहिले साईनाथ मी
कल्पतरुच्या छायेखाली
द्वारकामाई मंदिरी
वंदन केले, ठेऊनी माथा
साई चरणावरी
साई दर्शने तुटले पाश
लाभला निरंतर साईसहवास
साई ध्यानें मनतल्लीन
लागतां समाधी, न उरे भान
साई मोगरा फुलला, हृदयमंदिरी
साई नामे, तारिले जन्मांतरी

— श्री. बा.बा. चमणकर
'सुलक्ष्मी', शास्त्री नगर, डोंबिवली (पश्चिम)

# साई माझी गुरु माऊली

साई माझी गुरु माऊली ग गुरु माऊली ॥धृ॥
आली शिर्डी ग्रामी धन्य झाली ती शिर्डी
प्रथम साई माऊली खंडोबाच्या देवळात आली
खंडोबाच्या पुजारी म्हळसापती अहो साई अशी हाक मारली
साई माझी गुरु माऊली ग साई माझी गुरु माऊली ॥१॥
येथूनच गुरु माऊलीचे नांव साईबाबा म्हणून जग प्रसिद्ध जाहले
साईबाबा नावे शिर्डीस पावन केले
साईमाऊली द्वारकामाईत राहूनी धुनी पेटवूनी या धुनीतील
उदीचा महीमा जग प्रसिद्ध जाहला
साई.....ग साई माझी गुरु माऊली ॥२॥
साई माऊली निंबवृक्षाखाली तपश्चर्या करूनी कडूलिंबाची पाने
गोड करूनी दाखविली
जमीन खोदण्यास सांगून पाच पणत्या पेटलेल्या दाखवूनी
हेच माझे गुरुचे स्थान या ठिकाणी दर गुरुवारी शुक्रवारी

धुप जाळीत जा म्हणजे सर्वांचे कल्याण होईल असा उपदेश केला
साई.....ग साई माझी गुरु माऊली ॥३ ॥

साई माऊली बुटीच्या वाड्यात समाधीस्त होऊनी
साईबाबा नांव जग प्रसिद्ध केले
साईमाऊली दरबारात जातीभेद नाही, पंथ भेद नाही
गरीब श्रीमंत हा भेद नाही
"सबका मालिक एक" हा मंत्र देऊनी गेली
साई... साई माझी गुरु माऊली ॥४ ॥

**—श्री. सतेज अनंतराव पाटील**
श्री महाराष्ट्र आईल डेपो राजाराम पुरी
१० वी गल्ली कोल्हापूर

●

# स्वार्थी भक्त देवावर रुसतात तेव्हां

दिलेस ना जरी, इच्छित मजला।
मी नाही येणार, शिरडीला॥
मी नाही येणार ॥धृ ॥

आजवरी तव महिमा ऐकूनी।
प्रेमभरे तुज साद घातली॥
कुठे गुंतला भक्त सदनी।
माझ्यासाठी धाव आजला॥
नाही का येणार? शिरडीला
मी नाही येणार ॥धृ ॥

भक्त वत्सला सद्गुरु राया।
तुझाच महिमा जाईल विलया॥
निश्चय मनी मी केला सदया।
परत न कधी येणार। शिरडीला
मी नाही येणार ॥धृ ॥

**— सौ. कल्पना पै,**
६ सहकार लिबर्टी गार्डन रोड,
मुंबई :- ४०० ०६४.

# अगाध साईलीला

साईबाबा, मला तुझा आधार ।
उघड देवा साई तुझं द्वार ॥
तू दत्तसाई, रामसाई अन् गीतासाई ।
तूंच अल्ला, मौला साई अन् ईसा साई ॥
प्रत्यय आला साई मला ।
जेव्हां मी सांकडे घातले तुला ॥
पिठाची पोटली गिरणीत सांडली ।
तुझ्या सांकड्यानी मला गवसली ॥
धन्य तुझी किमया काय वर्णू मी पामरा ।
धन्य साई, धन्य जगी हा दत्त अवतार ॥
अनुभव हा लिहून पाठवीन म्हटले ।
अन् साईबाबा संकटी पावले ॥
शब्द अपुरे पडती, कोणा कोण गती ।
ते साईराम गुरुमाऊली तूं ते जाणती ॥

— **श्री शिवानंद व्यं सावंत**
घर नं. २५२, सिने विशांतच्या मागे
आर्के मंडगांव गोवा ४०३६०१

# बाबांची विभूती

बाबांची विभूती नियमाने ।
भक्तजन लावतील आनंदाने ।
बाबांचा मोठा तो प्रसाद ।
भक्तांना असे आशिर्वाद ।
बाबांना विनविती नियमाने ।
त्यांना दर्शन देतील आनंदाने ।
बाबांचे साई साई स्मरण करावे ।
त्यांनी दुःखासाठी नाही मरावे ।
बाबांचा तेजोमय आशिर्वादाचा हात ।
भक्तांचा कधीही होणार नाही घात ।
बाबांना मनोभावे जातील शरण ।
त्यांना कशासाठीही नाही मरण ।

बाबा असे भक्तांची माऊली ।
भक्तांवर संकटकाळी करी साऊली ।
बाबांची महती ज्याला नाही ।
त्याच्याविना साईराम नाही ।
बाबांस भक्तीरूपी अनेक पाही ।
त्यांच्यापास साईनाथ एक राही ।

— **श्री सीताराम नारायण पवार,**
१३/२ प्रतिरक्षा नगर,
सांताक्रूझ (पू.) मुं.नं. ५५

# माझे पुण्य फळा आले

माझे पुण्य फळा आले
आज मीऽ सांईनाथ पाहिले ॥धृ.॥
डोक्यावरतीऽ मुकुट सुंदर
चिलम-चिमटा हाती शोभते
साईनाथ तुम्ही गोजिर वाणी
बाबा, यतिवेषे सजले ॥१॥ आज मी.
शुभ्र कफनी अंगावरती
पायी खडावा विराजितते
साईनाथाचे रूप हे उज्वल
माझे, पाहुनी मन धाले ॥२॥ आज मी.
मुख कमलाची दिव्य झळाळी
शाली मधी, ते रूप मनोहर
गोट्या वरची मुर्ति पाहुनी
माझे, धन्य जीवन झाले ॥३॥ आज मी.
दीनांचा गुरु साई दयाळु
भक्तांसाठी होत कृपाळु
स्वर्ग सुखाची भेंट पाहुनी
बाबा, भाग्य माझे उजळले ॥४॥ आज मी.

— **श्री अशोक कुमार सातव**
सेक्टर नं. ५ सडक नं. २७
क्वॉर्टर नं. ५/सी भिलाई नगर
जिला दुर्ग (म.प्र.) पिन ४९०००६

# साईनामात दंग

साईनामात दंग मना लागलीया छंद ॥धृ॥
विसरलो देहभान
नाही भूक नाही तहान
मन असे स्वच्छंद साईनामात दंग ॥१॥
तुझे रुप चित्ती राहो
मुखी सदा साईनाम
चिरंतन समाधान साईनामात दंग ॥२॥
वेळ काळाचे ना बंधन
नको सुचिर्भूतता साहित्य
अवघेचि शुद्ध अंतःकरण साईनामात दंग ॥३॥
प्रेमे आरती ओवाळीन
भाव पुष्पे वाहीन
अखंड तुझे नाम गाईन साईनामात दंग ॥४॥
सर्व धर्म सम भाव
दया क्षमा शान्ती
जेथे असती त्या साईनामात दंग ॥५॥

**— श्री. तुलसीदास शंकर कदम**
डी/४०, गणाधिराज हौ. सोसायटी
मिठानगर रोड-मुलुंड पूर्व मुं-८१.

# साई भजन

(काळ्या मातीत माती)

साई मंदिरी मंदिरी भजन चालते, भजन चालते
मनी चालते तन मन जन झांज वाजवते, भजन...
शिर्डी रायाच्या मुर्तिले भक्तगण ववायते
माथा टेकून पायाले गंध कपाया लावते
भाव भक्तीन नमते डोयी फोटूले पाहेते
डोयी फोटूले पाहेते त्यात सरग दिसते
रूप साईचे दिसते, जनं हरषते, भजन....
नगरात रोषनाई कसं साजरं वदनं
परिमल परि येई मंदीर घमघमते

तिथ गाभारीचा गंध वेळ मनाले लावते
वेळ मनाले लावते रात भजनी सरते
मना माऊली आठते मुख भजन म्हणते
जन हरपते.....
दुख सरती भजनी ध्यानी शिरडी राहेते
जगी जीवन कुसय सदा मनाले टोचते
शिर्डी नगरास डोया सर्ग सपन पाहेते
डोया समन पाहेते अंगा कुसय टोचते
अंगा कुसय टोचते मन कासाविस होते
मनी भजन रंगते सर्ग सपन पाहेते

**— श्री मोहन सोनवणे**
नवागांव ता. नवापूर

# शिरडीच्या वाटेवर

रोम रोमी भिनली बाबा तुझी प्रेमगाथा।
प्रभु साईनाथा रे प्रभु साईनाथा ॥धृ॥
तुच माझी माता आणि असे ही पिता।
जगी अन्य नाही मज तुजविण माता।
गोड करून घेई माझी तूं ही वेडी सेवा ॥प्रभु साईनाथा ॥१॥
बहीण आणि बंधू तूच असे माझा।
रक्षी उभा राहूनी पाठीशी ही सदा।
आंस तुझ्या दर्शनाची लागलीसे मजला ॥प्रभु साईनाथा ॥२॥
पतीसेवा करतांना सदा आठव साईचा।
मुले माझी आहे साईरूप ठेवा।
संसारास नेई माझ्या शिरडीच्या वाटेला ॥प्रभु साईनाथा ॥३॥
शिरडीच्या वाटेवरची धुळ ही मजला असे प्रिय।
साईश्वराच्या पदस्पर्शाने झाली असे ती पावन।
धुळीतच त्या जन्म देई, साई मज पुन्हा पुन्हा ॥प्रभु साईनाथा ॥४॥

**— सौ. विद्या सुभाष सुलाखे**
गुप्ते चाळ, नेहरू मैदान गणेश मंदिर पथ
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. –"– | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. –"– | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. –"– | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. –"– | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. –"– | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. –"– | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. –"– | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. –"– | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. –"– | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. –"– | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. –"– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. –"– | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. –"– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | —— | —— |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH BYE 26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारका माई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

श्री. रा. द. बन्ने, संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे छापून प्रकाशित केले.